


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३१५ ■ सोमवार, दि.२५ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## बैलगाड्या व गाढव घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले कार्यकर्ते

# महागाई विरोधात वंचित आक्रमक







प्रतिनिधी २५ मे

**अकोला:** अच्छे दिन आयेंगे चे स्वप्न नागरिकांना दाखवून केंद्रात तसेच राज्यात सत्तेत आलेल्या भाजपच्या कार्यकाळात वाढलेल्या महागाईने नागरिक अक्षरशा मेटाकुटीला आले आहेत. पेट्रोल डिझेल तसेच घरगुती गॅस सिलेंडरच्या सतत वाढणाऱ्या किमती, वाढती महागाई आणि जीवनावश्यक वस्तूंच्या टंचाई विरोधात वंचित बहुजन आघाडी आक्रमक झाली असून आज पक्षाच्या वतीने शहरात भव्य बैलगाडी मोर्चा काढण्यात आला. शहरातील पक्ष कार्यालयापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. त्या मोर्चात मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी बैलगाड्या आणल्या होत्या तसेच काही कार्यकर्ते गाढव घेऊन सुद्धा मोर्चात सामील झाले होते. मोदी सरकार महागाई विरोधात तोंड उघडण्यास तयार नसून सरकारने मेलोडी चॉकलेट गिळून गप्प बसल्याच्या आरोप वंचित बहुजन आघाडी ने केला. संपूर्ण जिल्ह्यातील वंचित बहुजन चे कार्यकर्ते या मोर्चात बहुसंख्येने सामील झाले होते केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणामुळे सर्वसामान्य नागरिकांवरील आर्थिक भार वाढत असून पेट्रोल, डिझेल, खाद्यतेल, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या दरवाढीमुळे नागरिकांचे जगणे कठीण झाले आहे असा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला. सरकारला महागाई नियंत्रणात आणण्यात अपयश आल्याचा आरोप करत या विरोधात पुढील दिवसात जन आंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी बैलगाड्या आणल्या होत्या. बैलगाड्यांवर उभ्या असलेल्या महिला कार्यकर्त्यांच्या हातात पेट्रोल डिझेल मिळत नाही. बैलगाड्या शिवाय पर्याय उरत नाही अशा लिहिलेल्या पाट्या सर्वांचे ध्यान वेधून घेत होत्या. जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा पोहोचल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. बऱ्याच दिवसांनी शहरात एवढा मोठा मोर्चा पहावयास मिळाल्याचे अनेकांनी सांगितले. मोर्चात मोठ्या संख्येने पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.



## पेट्रोल-डिझेलच्या दरात दहा दिवसात चौथ्यांदा वाढ!

### ७ रूपयांनी महागले, धीरे का झटका जोरसे लागे!

**अशी झाली चारवेळा दरवाढ**

१५ मे- पेट्रोल- ३ रुपये, डिझेल- ३.११ रुपये
१९ मे- पेट्रोल- ८७ पैसे, डिझेल- ९० पैसे
२३ मे- पेट्रोल- ९० पैसे, डिझेल- ९१ पैसे
२५ मे- पेट्रोल- २.६१ रुपये, डिझेल २.१७ रुपये

प्रतिनिधी २५ मे

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वीच देशवासीयांना खाद्यतेल आणि पेट्रोल-डिझेलची बचत करण्याचे आवाहन केल्यानंतर अनेकांना देशावरील आगामी आर्थिक अरिष्टाची चाहूल लागली होती. पंतप्रधान मोदी यांच्या या वक्तव्यानंतर अवघ्या काही दिवसांमध्येच देशभरात पेट्रोल आणि डिझेलचे भाव कडाडले आहेत. गेल्या दहा दिवसांमध्ये पेट्रोल आणि डिझेल दरात चारवेळा वाढ झाली आहे. सोमवारी देशभरात चौथ्यांदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ झाली. त्यानुसार आता पेट्रोलचे दर २.६१ रुपयांनी आणि डिझेलच्या दरात २.१७ रुपयांनी वाढ झाली आहे. यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सर्वात आधी वाढ झाली होती. त्यानंतर दहा दिवसांत पेट्रोल आणि डिझेलचे दर सातत्याने वाढत गेले होते. पेट्रोल आणि डिझेलच्या या दरवाढीमुळे सामान्य जनता आणि व्यावसायिकांमध्ये रोषाचे वातावरण आहे.

पंतप्रधानांच्या आवाहनानंतर देशवासीयांना आगामी काळात पेट्रोल आणि डिझेलचे भाव वाढतील, याचा अंदाज आला होता. इराण विरुद्ध अमेरिका-इस्त्रायल युद्धामुळे जागतिक पातळीवर खनिज तेलाचा तुटवडा निर्माण होऊन दर कडाडले आहेत. त्यामुळे भारतीयांनी सोने खरेदी, इंधन बचत आणि खाद्यतेलाची बचत या त्रिसूत्रीचे कसोशीने पालन करावे, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले होते. खनिज तेलाचे दर वाढल्यामुळे भारतामधील पेट्रोलियम कंपन्यांना प्रचंड तोटा सहन करावा लागत होता.

## काँग्रेसचे ७० नगरसेवक अचानक संपर्काबाहेर!

प्रतिनिधी २५ मे

**चंद्रपूर :** राज्यात १७ जागांवरील विधान परिषदांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. सत्ताधारी महायुतीमध्ये जागा वाटपाची चर्चा सुरू असतानाचा मविआतील काँग्रेसमधील ६० ते ७० नगरसेवक बेपत्ता झाल्याची बातमी समोर येते आहे. वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली विधान परिषद निवडणुकीची पार्श्वभूमीवर मोठी घडामोड होत आहेतरु उमेदवार निश्चित नसतानाही नगरसेवकांची पळवापळवी सुरू झाल्याची चर्चा रंगली आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीच्या आधी काँग्रेसचे जवळपास ७० नगरसेवक संपर्क क्षेत्राबाहेर गेल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे.काँग्रेसचे नगरसेवक अज्ञातस्थळी रवाना झाल्याचं सांगितलं जात आहे. परंतु नगरसेवक गायब झाल्याने काँग्रेस नेत्यांची चिंता वाढली आहे. पक्षांतर्गत अस्वस्थता समोर आली आहे. विधान परिषदेची निवडणूक ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधीच्या निवडणुकीत होणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषद, नगरसेवक मतदान करतील, त्यामुळे प्रत्येक नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्याला महत्त्व आले आहे. अशातच भाजपने मोठी खेळी खेळली आहे. दरम्यान नगरसेवक गायब झाल्यानं विधान परिषदेच्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात घोडे बाजार होत असल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात येत आहे.

## सोमवार अपघातवार : दोन अपघातात १४ ठार!

प्रतिनिधी २५ मे

**धुळे :** सोमवारीची पहाट दोन भीषण अपघातांच्या घटनांनी उजाडली. संपूर्ण महाराष्ट्र हादरून टाकणाऱ्या या अपघातात १४ जण ठार तर २६ जण गंभीर जखमी झाले आहेत. आंबेनळी घाटाच्या ८०० फूट खोल दरी स्कॉर्पिओ कोसळली तर लळींग घाटात तिहेरी अपघात घडला आहे. या दोन्ही घटनांनी राज्यावर शोककळा पसरली आहे.मुंबई-आग्रा महामार्गावरील धुळेजवळील लळींग घाट परिसरात सोमवारी पहाटेच्या सुमारास एक अत्यंत भीषण आणि थरकाप उडवणारा तिहेरी अपघात घडला आहे. रेतीचा डंपर, ट्रक आणि एक खाजगी ट्रॅव्हल्स बस यांच्यात झालेल्या या विचित्र अपघातात ६ जणांचा जागीच मृत्यू झाला.



**महाबळेश्वर:** राज्यातील महाबळेश्वर आणि पोलादपूरदरम्यान असलेल्या धोकादायक आंबेनळी घाटात घडलेल्या भीषण अपघाताने सगळेच हादरले आहेत. कोकणच्या सफरीवरून परत येणाऱ्या पर्यटकांना घेऊन जाणारी स्कॉर्पिओ जीप अचानक अनियंत्रित झाली आणि ८०० फूट खोल दरीत कोसळली. या भीषण अपघातात ८ तरूण मित्रांचा दुर्दैवी मृत्यू झाला. दुर्बीणीच्या मदतीने मृतदेहांचा शोध घेतला जात होता.प्राथमिक अहवालानुसार, हा भीषण अपघात रविवार आणि सोमवारी पहाटे २.४५ वाजेच्या सुमारास दाबेली गावाजवळ घडला. सर्व मृतक हे सातारा व आसपासचे रहिवासी असल्याचे समजते. त्यांची नावे महेश अनिल पवार (२५), आदित्य अशोक साळुंखे (२१), रितेश राजेंद्र लोखंडे (२५), सुहास जितेंद्र लोखंडे (२०), अंश समीर चव्हाण (१८), उत्कर्ष आनंद शिंगटे (२१), अनिल अभिमन्यू शिंगटे (२५) आणि नितीन किसन नायकोंडे (३५), अशी आहेत.






सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

सोमवार, दि. २५ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## पशुपालकांना १०० टक्के अनुदानावर चारा बियाणे!

**अकोला :** राज्यातील संभाव्य दुष्काळ आणि चाराटंचाईचा धोका लक्षात घेऊन पशुपालकांसाठी १०० टक्के अनुदानावर चारा बियाणे योजना सुरू करण्यात आली आहे. अकोला जिल्ह्यातही या योजनेची अंमलबजावणी सुरू झाली असून, पात्र शेतकरी आणि नोंदणीकृत शेतकरी समूहांना हिरवा चारा उत्पादनासाठी मोफत बियाणे उपलब्ध करून दिले जाणार आहे. पशुधनासाठी वर्षभर चारा उपलब्ध राहावा, हा यामागील मुख्य उद्देश आहे. यासाठी पशुपालकांनी वेळेत अर्ज करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाद्वारे करण्यात आले आहे. 'एल हवामान विभागाने निनो'चा प्रभाव लक्षात घेऊन यंदा कमी पर्जन्यमानाचा अंदाज व्यक्त केल्यामुळे हिरव्या चाऱ्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्हा पशुसंवर्धन विभागाने जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत 'वैरण विकास योजना-चारा उत्पादन कार्यक्रम' सुरू केला आहे.

# सरन्यायाधीशांचे आभार : जागवला तरुणांमध्ये एल्गार...!

सर्वोच्च न्यायालयात एका वकिलाने आपल्याला वरिष्ठ वकिलाचा दर्जा मिळावा यासाठी याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर १५ मे रोजी सुनावणी सुरू असतांना सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी याचिका दाखल करणाऱ्या वकिलाला फटकारले आणि न्यायव्यवस्थेवर टिका करणाऱ्या काही घटकांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच त्यांनी तोंडी टिप्पणी करतांना बेरोजगार युवक, सोशल मीडिया युजर्स आणि माहिती अधिकार कार्यकर्त्यांची तुलना थेट 'झुरळे' आणि 'परजीवी' यांच्याशी केली. त्यामुळे बरेच वाद विवाद सुरू झाले आहेत. सरन्यायाधीशांच्या या टिप्पणीमुळे निर्माण झालेल्या वादानंतर, १६ मे रोजी अभिजीत दिपके यांनी 'कॉकरोच जनता पार्टी' नावाचा एक व्यंगात्मक डिजिटल गट सुरू केला. या माध्यमातून बेरोजगार तरुणांमध्ये भ्रष्ट व हुकूमशाही व्यवस्था आणि सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे वाढत्या बेरोजगारीविरुद्ध एल्गार उभा झाला, त्याबद्दल खरं तर सरन्यायाधीशांचे आभार मानले पाहिजेत.

**तरुणांचा उद्रेक विधायक क्रांतीच्या दिशेने उभा व्हावा :** सध्या भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था झाल्याचे सांगण्यात येत असून देशाचा आर्थिक विकास दर मजबूत असल्याचे बोलले जाते. मात्र, या आर्थिक वाढीसोबतच बेरोजगारी आणि दर्जेदार रोजगारांच्या निर्मितीतील आव्हाने कायम आहेत. त्यातच आता महागाईने उच्चांक गाठला असून यावर उपाययोजना शोधण्यापेक्षा सरकार लोकांनाच वेठीस धरत आहे. एका आर्थिक सर्वेक्षणानुसार, देशाचा बेरोजगारी दर ३.२ टक्केच्या आसपास नोंदवला गेला आहे. औपचारिक नोकऱ्यांच्या तुलनेत असंघटित क्षेत्र आणि कंत्राटी व अल्पकालीन रोजगारांवर अवलंबून राहण्याचे प्रमाण वाढले आहे.

आर्थिक वृद्धी होत असली तरी, शिक्षित युवकांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण अजूनही जास्त आहे आणि वेतनवाढ समाधानकारक नाही. गेल्या काही वर्षापासून देशात खाजगीकरणाच्या नावाखाली देशाची अर्थव्यवस्था मूठभर भांडवलदारांच्या दावणीला बांधली गेली आहे. त्यामुळे महागाई व बेरोजगारी प्रचंड प्रमाणात वाढत आहे. दुसरीकडे शिक्षित तरुण मेहनतीने विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत. मात्र शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचाराने थैमान घातले असून स्पर्धा परीक्षांमध्ये गैरप्रकार व पेपरफुटीची प्रकरणे वाढली आहेत. रोजगार मागण्यासाठी मोर्चा काढणाऱ्या तरुणांवर पोलिसांकडून ते देशद्रोही असल्यासारखा लाठीमार करून व पाण्याचे फवारे सोडून त्यांचा आवाज दाबून टाकला जात आहे. परिणामी देशातला तरुण अस्वस्थ आहे. या अस्वस्थतेतून सिजेपीला मिळालेला प्रतिसाद ही सरकारसाठी धोक्याची घंटा असल्याची नांदी ठरू नये म्हणून अभिजित दिपके यांच्या एक्स अकाउंटवर बंदी घातली आणि त्याला जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत. ही बाब व्यवस्थेचे अपयश दर्शविणारी आहे.एकीकडे सरकारी नोकऱ्या उपलब्ध नाहीत, हाताला काम नाही, उद्योगासाठी पैसा नाही. त्यातच कंत्राटी पद्धतीने नोकर भरती करून सरकार शिक्षित तरुणांची टिंगल करत आहे आणि आता सरन्यायाधीशांनी देखील तरुणांना झुरळ व परजीवीची उपमा देऊन अपमानित केले आहे. त्यामुळे तरुणाईत उद्रेक निर्माण होणे साहजिक आहे. या उद्रेकातून विधायक संघर्ष उभा व्हावा आणि सामाजिक, आर्थिक व राजकीय लोकशाही बळकट करण्यासाठी तरुणाईने पुढे यावे हीच सदिच्छा.

**'देशाच्या प्रगतीची धुरा, तरुणांच्या हाती ;**
**नव्या विचारांनी करूया, भारताची प्रगती!'**
जयभारत, जय जवान,
जय किसान, जय संविधान...

प्रा. डॉ.एम.आर.इंगळे
विभागीय सचिव डाटा अकोला

## सिजेपी, तरुणाईचा एल्गार आणि व्यवस्था

झुरळ जनता पार्टी अर्थात सिजेपी म्हणजे, 'ज्या लोकांना मोजायला व्यवस्था विसरली, त्यांच्यासाठीचा राजकीय पक्ष होय' हा पक्ष स्वतःला 'आळशी आणि बेरोजगारांचा आवाज' म्हणवतो. या पक्षाच्या वेबसाइटवरील 'पात्रता निकषांनुसार', पक्षात सामील होण्यासाठी व्यक्ती 'बेरोजगार, आळशी आणि सतत ऑनलाइन' असणे आवश्यक आहे आणि तिच्यामध्ये 'व्यावसायिकपणे संताप व्यक्त करण्याची क्षमता' असली पाहिजे. या पक्षाने मीम्सचा वापर करून केलेल्या धारदार राजकीय व्यंग आणि भाष्याद्वारे ऑनलाइन प्रसिद्धी मिळवली. त्यांची बहुतेक सामग्री बेरोजगारी, परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटणे आणि शिक्षण यांसारख्या तरुणांच्या समस्यांवर केंद्रित असते, जी ग्राफिक्स, ॲनिमेशन, जाहीरनामे आणि सनदेच्या स्वरूपातील मागण्यांच्या माध्यमातून सादर केली जाते.

'सिजेपी' या ग्रुपच्या माध्यमातून तरुणांमध्ये भ्रष्ट व्यवस्थेविरुद्ध धुमसत असलेल्या उद्रेकाचा विस्पोट झाला. तरुण उघडपणे आपल्या भावना व्यक्त करू लागले. त्यांच्यात व्यवस्थेविरुद्ध डिजिटल का होईना पण एल्गार करण्याची भावना जागृत झाली. सिजेपी मुळे व्यवस्थेतील मनमानी आणि भ्रष्टाचार उखडून फेकण्यासाठी शांततेच्या मार्गाने उभी होत असलेली क्रांती फार आवश्यक आहे. कारण तरुणच परिवर्तन घडवू शकतात. सिजेपी ग्रुपने अवघ्या काही दिवसात मिळविलेली लोकप्रियता आणि त्यातून तरुणांमध्ये व्यवस्थेविरुद्ध व्यक्त होत असलेल्या संतापाच्या उद्रेकामुळे कदाचित सरकार विरुद्ध जेन झी आंदोलन उभे होईल याचा सरकारने धसका घेतला आहे. त्यामुळे या पक्षाचे एक्स अकाउंट भारत सरकारने कायदेशीर मागणीनंतर ब्लॉक केले. त्यासाठी सरकारने आयटी ॲक्टच्या कलम ६९ ए अंतर्गत गुप्तचर विभागाच्या अहवालाचा हवाला देत राष्ट्रीय सुरक्षा आणि सुव्यवस्था धोक्यात येत असल्याचे कारण दिले. पण कोणत्याही डिजिटल किंवा सोशल ग्रुपमुळे अवघ्या काही दिवसात राष्ट्रीय सुरक्षा व सुव्यवस्था धोक्यात आली आहे असा दावा करणे हायस्पद वाटते.

खरं म्हणजे सिजेपीने अवघ्या काही दिवसांत सोशल मीडियावर इतकी प्रचंड लोकप्रियता मिळवली की, इन्स्टाग्राम हॅंडलने थेट सत्ताधारी भाजपच्या फॉलोअर्सचा आकडाही ओलांडला. सिजेपीचा वाढता प्रभाव पाहून सरकारने त्याचे एक्स अकाउंट भारतात ब्लॉक करण्याचे निर्देश दिले, याचा अर्थ सरकारला तरुणांमध्ये सजगता, जागरूकता व वैचारिकता निर्माण होऊ नये असेच वाटते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

## कॉकरोच जनता पार्टी व तरुण

सरन्यायाधीशांच्या वाक्यावरून अभिजित दिपके या तरुणाने डिजिटल माध्यमातून सुरू केलेल्या या पक्षाने काही तासांतच, इंटरनेटवर धुमाकूळ घातला आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लाखो फॉलोअर्स मिळवले. आज, त्याचे इंस्टाग्रामवर १९ दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स आहेत, जे भारतातील इतर कोणत्याही राजकीय पक्षापेक्षा जास्त आहेत. तरुणांचा या ग्रुपला मिळालेला प्रचंड प्रतिसाद आणि त्यांच्यात होत असलेली जागरूकता लक्षात घेऊन या ग्रुपच्या एक्सवर, गुरुवारी भारतातील एका कायदेशीर मागणीमुळे अनुपलब्ध होण्यापूर्वी, त्याचे २००,००० हून अधिक फॉलोअर्स होते. अभिजित दिपके यांच्या पक्षाला विविध राजकारणी, कार्यकर्ते, कलाकार आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील लाखो वापरकर्त्यांचा पाठिंबा मिळाला आहे.

## अभिजित दिपके लोकशाहीचा सजग प्रहरी

प्राप्त माहितीनुसार अभिजित दिपके हा ३० वर्षीय तरुण आहे. त्याने पुण्यातून पत्रकारितेची पदवी घेतली असून सध्या तो बॉस्टन विद्यापीठात जनसंपर्क विषयात पदव्युत्तर शिक्षण घेत आहे. २०२० ते २०२३ या काळात तो आम आदमी पार्टीशी संबंधित होता आणि त्याने पक्षाच्या सोशल मीडिया टीममध्ये स्वयंसेवक म्हणून काम केले होते. अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने जिंकलेल्या २०२० च्या दिल्ली विधानसभा निवडणुकी दरम्यान अभिजीतने मीम-आधारित डिजिटल प्रचारावर काम केले होते. देशातील व्यवस्थेत वाढलेला भ्रष्टाचार, सरकारचे कायदबाह्य निर्णय, आर्थिक विषमता व बेकारी वाढविणारी आणि मूठभर भांडवलदारांचे हित साधणारी आर्थिक धोरणे याबद्दल तो सतर्क असून युवकांमध्ये जागृती निर्माण व्हावी यासाठी तो सजग आहे, म्हणजे खऱ्या अर्थाने तो लोकशाहीचा प्रहरी आहे.

# प्लास्टिकमुक्त पृथ्वी : आजच्या काळाची गरज

मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आधुनिक जीवन अधिक सुलभ केले, परंतु या प्रगतीच्या प्रवासात काही अशा गोष्टी निर्माण झाल्या ज्यांनी आज संपूर्ण पृथ्वीसमोर गंभीर संकट उभे केले आहे. प्लास्टिक ही त्यापैकीच एक महत्त्वाची गोष्ट आहे. एकेकाळी सोयीचे आणि स्वस्त साधन म्हणून वापरात आलेले प्लास्टिक आज पर्यावरण, मानवाचे आरोग्य, जैवविविधता आणि भविष्यातील पिढ्यांसाठी मोठा धोका ठरत आहे. या वाढत्या धोक्याबद्दल जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २५ मे रोजी 'आंतरराष्ट्रीय प्लास्टिक मुक्त दिन' साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे प्लास्टिकचा वाढता वापर कमी करणे, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारणे आणि पृथ्वीला प्रदूषणमुक्त करण्यासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा आहे. आजच्या आधुनिक जीवनात प्लास्टिकचा वापर इतका वाढला आहे की त्याशिवाय जीवनाची कल्पनाच करणे कठीण झाले आहे. घरातील भांडी, पाण्याच्या बाटल्या, पिशव्या, अन्नपदार्थांचे पॅकेजिंग, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वैद्यकीय साहित्य, वाहनांचे भाग, खेळणी, फर्निचर अशा असंख्य वस्तूंमध्ये प्लास्टिकचा वापर केला जातो. प्लास्टिकचे वजन कमी, किंमत स्वस्त आणि टिकाऊपणा जास्त असल्यामुळे त्याचा वापर झपाट्याने वाढला. टिकाऊपणामुळे प्लास्टिक सहज नष्ट होत नाही आणि शेकडो वर्षे पर्यावरणात तसेच राहते. परिणामी जमीन, पाणी आणि हवा या तिन्ही घटकांचे प्रदूषण वाढत चालले आहे.

प्लास्टिकचा इतिहास पाहिला तर विसाव्या शतकाच्या सुरुवातीला कृत्रिम पदार्थांच्या शोधातून त्याची निर्मिती झाली. सुरुवातीला त्याचा वापर मर्यादित प्रमाणात होत होता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर उद्योगक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिकचा वापर सुरू झाला. स्वस्त आणि टिकाऊ असल्यामुळे प्लास्टिकने जगभरातील बाजारपेठ व्यापली. आज जगात



दरवर्षी कोट्यवधी टन प्लास्टिकची निर्मिती केली जाते. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार दरवर्षी सुमारे ४० कोटी टनांहून अधिक प्लास्टिक निर्माण होते आणि त्यातील मोठा भाग एकदाच वापरून फेकून दिला जातो. हे प्लास्टिक नद्यांमधून समुद्रात जाते आणि समुद्री जीवांसाठी घातक ठरते. एकेकाळी बाजारात कापडी पिशव्या, मातीची भांडी, धातूची साधने आणि नैसर्गिक पदार्थांपासून तयार होणाऱ्या वस्तू वापरल्या जात होत्या. परंतु प्लास्टिकच्या स्वस्त आणि सोयीस्कर पर्यायामुळे पारंपरिक वस्तूंचा वापर कमी होत गेला. दुकानात खरेदीसाठी गेल्यावर प्लास्टिकच्या पिशव्या सहज दिल्या जाऊ लागल्या. बाटलीबंद पाणी, प्लास्टिक कप, चमचे, स्ट्रॉ, थर्माकोलच्या प्लेट्स आणि विविध पॅकेजिंग साहित्यामुळे प्लास्टिकचा वापर दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला. या सोयीमागे लपलेले पर्यावरणीय संकट मात्र मानवाला उशिरा समजले.

प्लास्टिकमुळे निर्माण होणारे सर्वात मोठे संकट म्हणजे प्रदूषण. प्लास्टिक सहज कुजत नाही. जमिनीत टाकलेले प्लास्टिक अनेक वर्षे तसेच राहते. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. शेतीमधील पाण्याचा निचरा अडतो. जनावरे प्लास्टिक खातात आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा कचऱ्यातील प्लास्टिक जाळले जाते. त्यातून विषारी वायू बाहेर पडतात. हे वायू मानवाच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक असतात. प्लास्टिक जाळल्यामुळे डायॉक्सिन आणि फ्युरानसारखे विषारी घटक वातावरणात मिसळतात. त्यामुळे श्वसनाचे आजार, कर्करोग आणि त्वचारोग यांसारख्या समस्या वाढतात. समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण ही आजची सर्वात गंभीर पर्यावरणीय समस्या मानली जाते. दरवर्षी लाखो टन प्लास्टिक समुद्रात मिसळते. समुद्री पक्षी, कासव, मासे आणि इतर जलचर प्राणी प्लास्टिकचे तुकडे अन्न समजून खातात. त्यामुळे त्यांच्या पोटात प्लास्टिक साचते आणि त्यांचा मृत्यू होतो. अनेक वेळा मासेमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या जाळ्यांमध्ये समुद्री जीव अडकतात. समुद्रातील सूक्ष्म प्लास्टिकचे कण अन्नसाखळीत प्रवेश करत आहेत. मासे आणि इतर समुद्री अन्नाद्वारे हे सूक्ष्म कण पुन्हा मानवाच्या शरीरात पोहोचतात. संशोधनातून असे स्पष्ट झाले आहे की सूक्ष्म प्लास्टिक मानवी रक्त, फुफ्फुसे आणि अगदी गर्भाशयातही आढळू लागले आहे.



डॉ. राजेंद्र बगाटे

## दिन विशेष

### बदललेली लाइफस्टाइल, चुकीच्या आहारामुळे थायरॉइड!



**आज जागतिक थायरॉइड दिन**

जगभरात थायरॉईडच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. या आजाराविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी २५ मे रोजी जागतिक थायरॉईड दिन साजरा केला जातो. बदललेली लाईफस्टाईल आणि चुकीचा आहार यामुळे थायरॉईडचा त्रास सुरु होतो. पुरुषांपेक्षा स्त्रियांना थायरॉईडचा त्रास होण्याचे प्रमाण जास्त असल्याचे काही सर्वेक्षणांमध्ये आढळले आहे. थायरॉईडचा त्रास असल्याने शरीरातील इतर अवयवांच्या कामावरदेखील परिणाम होतो.

थायरॉईडचे हायपोथायरॉइडिजम आणि हायपरथायरॉइडिजम हे दोन प्रकार आहेत. जेव्हा थायरॉईड ग्रंथीमधून जास्त हार्मोन्सची निर्मिती होते. तेव्हा हायपरथायरॉइडिजम होतो. तर जेव्हा थायरॉईड ग्रंथीमधून पुरेशा प्रमाणात हार्मोन्सची निर्मिती होत नाही, तेव्हा हायपोथायरॉइडिजम होतो. हायपोथायरॉइडिजम झाल्यावर वजन वाढणे, थकवा येणे आणि निराश वाटणे अशी लक्षणे जाणवायला लागतात. तर हायपरथायरॉइडिजममुळे वजन कमी होते.

जागतिक थायरॉईड दिन २०२४ ची थीम असंसर्गजन्स आजार अशी होती.

**थायरॉईड म्हणजे काय?**
थायरॉईड ही गळ्याच्या पुढच्या भागात असलेली एक फुलपाखराच्या आकाराची ग्रंथी आहे. ही ग्रंथी टी३ आणि टी४ हार्मोन्स तयार करते, जे शरीराची ऊर्जा आणि चयापचय नियंत्रित करतात.

**थायरॉईडचे मुख्य प्रकार हायपोथायरॉईडीझम :** यामध्ये थायरॉईड हार्मोन्सचे प्रमाण कमी होते. यामुळे वजन वाढणे, थकवा आणि सतत झोप येणे यांसारख्या समस्या उद्भवतात.

**हायपरथायरॉईडीझम :** यामध्ये हार्मोन्सचे प्रमाण वाढते. यामुळे वजन कमी होणे, हृदयाचे ठोके जलद पडणे आणि चिडचिड होणे अशी लक्षणे दिसतात.

**मुख्य लक्षणे**
अचानक वजन वाढणे किंवा कमी होणे. सतत थकवा जाणवणे आणि केस गळणे. त्वचा कोरडी पडणे आणि महिलांमध्ये मासिक पाळीत अनियमितता. मानेवर सूज किंवा गाठ जाणवणे.

**थायरॉईड नियंत्रणासाठी काय करावे?**
आहारात आयोडीनयुक्त मीठ, हिरव्या पालेभाज्या आणि फळांचा समावेश करावा. नियमित व्यायाम आणि तणावमुक्त जीवनशैली ठेवावी. रक्ताची चाचणी करून डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार घ्यावेत. तुम्हाला किंवा तुमच्या ओळखीतील कोणालाही थायरॉईडची लक्षणे जाणवत असल्यास, जवळील लॅब किंवा हॉस्पिटलमध्ये जाऊन थायरॉईड चाचणी करून घेणे आवश्यक आहे.

## पातुर नगरपरिषद निवडणूक अर्ज दाखल करण्यासाठी वेगवेगळ्या पक्षाची प्रचंड गर्दी



प्रतिनिधी २५ मे

**पातूर :** पातूर नगर परिषदेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सोमवारी विविध राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी गर्दी केली होती. राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या निवडणुकीत कॉंग्रेस, शिवसेना उबाठा गटाची युती आहे. तसेच, पातुर विकास आघाडी ,भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदे गट व अपक्ष यांची उमेदवारी अर्ज दाखल करण्याकरिता प्रचंड गर्दी केली होती. निवडणुकीला रंगत आली आहे. विविध राजकीय पक्षाकडून मोर्चे बांधणी सुरू आहे. नगर परिषद आपल्या ताब्यात यावी म्हणून फिल्डींग लावली जात आहे.

## बसमध्ये चढताना महिलेचे मंगळसूत्र लंपास

### बीड येथील आरोपी अटकेत

**अकोट :** बसस्थानकावरील गर्दीचा फायदा घेत महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मिनी मंगळसूत्र चोरणाऱ्या आरोपीला अकोट शहर पोलिसांनी अवघ्या एका तासात अटक करून चोरीचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे शहर पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक होत आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रेखा देवेंद्र सदार (वय ६०, रा. पिंपळोद ता. दर्यापूर, जि. अमरावती) या आपल्या वहिनी संगीता फसाले यांच्यासह २० मे रोजी उपचारासाठी अकोट येथील खासगी दवाखान्यात आल्या होत्या. उपचार आटोपल्यानंतर दुपारी सुमारे १ वाजताच्या दरम्यान त्या अकोट



बसस्थानकावर पिंपळोदला जाण्यासाठी आल्या.

दरम्यान, अकोट-यवतमाळ बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने रेखा सदार यांच्या गळ्यातील ११.५० ग्रॅम वजनाचे व सुमारे ७५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मिनी मंगळसूत्र तोडून चोरून नेले. याप्रकरणी अकोट शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५०३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन अकोट शहर पोलिसांनी तात्काळ तपासाची सूत्रे हलवली. फिर्यादीने दिलेल्या आरोपीच्या वर्णनाच्या आधारे पोलिसांनी परिसरात शोधमोहीम राबवून अवघ्या एका तासात शैलेंद्र उर्फ बंडू सुरेश जाधव (वय ४४, रा. बलभीमनगर, जि. बीड) याला ताब्यात घेतले. पोलिसी चौकशीत आरोपीने चोरीची कबुली दिली.

## उमरी परिसरातील पथदिवे बंद

**अकोला :** लहान उमरी परिसरात वीज पुरवठ्याची समस्या वारंवार निर्माण होत असून, शनिवारी रात्रीच्या सुमारास या भागातील पथदिवे बंद असल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागला. संध्याकाळी सात वाजेपासूनच हे पथदिवे बंद असल्याने सर्वत्र अंधार पसरला होता. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने व दिवसभर ऊन असल्याने लहान मुले संध्याकाळी रस्त्यावर खेळत असतात. मात्र पथदिवे बंद असल्याने त्यांचा हिरमोड झाला होता. तसेच गल्लीबोळात अंधार असल्याने अनुचित घटना घडण्याचीही शक्यता नाकारता येत नाही, अशी भीती या भागातील नागरिकांमधून व्यक्त होत होती.

## मराठा सेवा मंडळाद्वारे २७ मे रोजी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी २५ मे

**अकोला :** मराठा सेवा मंडळाने मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याचे मराठा सेवा मंडळाने आयोजित केले आहे. जे विद्यार्थी १० वी ७०३ व १२ वी ६५३ च्या परिक्षेमध्ये पेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत त्यांना गुणाक्रमाने प्रथम, द्वितीय व तृतीय असे १० वी व १२ वी करीता रोख स्वरूपात पुरस्कार देण्यात येतील.

२७ मे वार बुधवारी २०२६ वेळ सायंकाळी ६.०० वाजता पत्रकार भवन, लक्झरी बस स्टॅन्ड समोर, निमवाडी अकोला येथे संपन्न होणार आहे. समाजातील गुणवंत प्राप्त विद्यार्थ्यांनी आपली नोंदणी २५ पर्यंत समाज बांधवांनी आपल्या पाल्याची नोंदणी करण्याचे आवाहन मराठा सेवा मंडळाचे अध्यक्ष मुरलीधर सटाले, महिला कार्यकारिणी अध्यक्षा माधुरीताई बिडवे तसेच मारोतीराव भगत, पंडीत चौधरी, नागोराव लाटे, प्रदिप लुगडे, गजानन थिटे, संजय केंदळे, सुनिल चव्हाण, कैलास गाडवे, बाळकृष्ण जाधव, कैलास दळवी, सुर्यकांत चव्हाण, आशिष जाधव, संभाजी खेडकर, निलेश जरांगे, यांचे कडे करावी. असे आवाहन मंडळाचे सचिव गणेश गिराम यांनी केले आहे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
सोमवार, दि. २५ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## लॉज मध्ये युवकाचा संशयास्पद मृत्यू

**मूर्तिजापूर :** स्टेशन भागातील गोदावरी लॉज मध्ये चंद्रपूरच्या ऊर्जा नगरातील ३६ वर्षीय युवक बेशुद्धावस्थेत आढळला. त्याला रूग्णालयात नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. प्राप्त माहितीनुसार श्याम दशरथ मलवळकर वय अंदाजे ३६ वर्ष रा. उर्जा नगर चंद्रपुर हे गोदावरी लॉज मध्ये थांबले होते. २४ मे रोजी दुपारी साफसफाई करणारा रोहीत गोडाले हा रुम नं १०८ मध्ये गेला असता श्याम दशरथ मलवळकर हा पलंगावर निपचित पडलेला दिसला. लॉजचे मालक रमेश शर्मा यांना माहिती दिली.

# ओव्हरलोड ट्रकमुळे हातरूण-बोरगाव वैराळे रस्त्याची दुरावस्था

### ग्रामस्थांचा रास्ता रोको



**हातरूण :** बाळापूर तालुक्यातील सोनाळा परिसरातून मोर्णा नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात जेसीबीच्या सहाय्याने माती उत्खनन करून ती विटभट्ट्यांवर वाहतूक केली जात आहे. हातरूण, बोरगाव वैराळे आणि निमकर्दा मार्गावरून दिवस-रात्र ओव्हरलोड ट्रकची वाहतूक सुरू असल्याने रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. धुळीचे साम्राज्य, मोठमोठे खड्डे आणि भरधाव ट्रकमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून संतप्त ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन करत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

सोनाळा येथील मोर्णा नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात मातीचे उत्खनन सुरू असून ही माती विटभट्ट्यांसाठी बाळापूर आणि हाता अंदुरा परिसरात वाहून नेली जात आहे. यासाठी वापरले जाणारे ओव्हरलोड ट्रक हातरूण, बोरगाव वैराळे आणि निमकर्दा मार्गावरून भरधाव वेगाने धावत असल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांसह ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ट्रकांमधून उडणाऱ्या धुळीमुळे घरांमध्ये धुळीचे थर साचत असून नागरिकांना अंगणात बसणेही कठीण झाले आहे. कपडे बाहेर वाळत टाकणेही अवघड झाले असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

विशेष म्हणजे, अनेक ट्रक विनातारपत्री माती वाहतूक करत असल्याने शासनाच्या नियमांचेही उल्लंघन होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या मार्गावर मशिद, मदरसा आणि शाळांसमोरूनही भरधाव ट्रकांची वाहतूक सुरू असल्याने अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या जड वाहनांच्या वाहतुकीमुळे ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा पाइपलाईनचे नुकसान होऊन काही काळ पाणीपुरवठाही ठप्प झाला होता. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने दखल घेत नसल्याने संतप्त ग्रामस्थांनी २३ मे रोजी रास्ता रोको आंदोलन करत ओव्हरलोड वाहतूक तात्काळ बंद करण्याची मागणी केली.

**वादग्रस्त विषय**

या भागात अवैध खनिज उत्खनन हा नेहमीच वादग्रस्त विषय राहिला आहे. तसेच जड वाहनांची ये जा सारखी सुरू असते. या विरोधात कारवाई करण्यात यावी म्हणून महसूल विभागाचे लक्ष वेधले जाते. परंतु एखाद्या कारवाई नंतर देखील दुष्टचक्र सुरू राहते. त्याला आळा बसत नाही. त्यामुळे वाळू माफियांची हिंमत वाढते. परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. संबंधितांना जरब बसवल्या शिवाय गैरप्रकाराला आळा बसणार नाही हेही खरे आहे. रात्रंदिवस वाहनांची ये-जा सुरू असते, त्याबाबत ओरड होऊनही त्याला पायबंद बसत नाही या विषयी संताप व्यक्त केला जात आहे.

## ग्राम पोही व रोहना पुनर्वसनाच्या कामाला मिळणार वेग

**♦ जलसंपदा मंत्र्यांची आमदार हरीश पिंपळे यांनी घेतली भेट**



**मूर्तिजापूर :** तालुक्यातील ग्राम पोही आणि रोहना येथील प्रलंबित पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाची पावले उचलली जात आहेत. यासाठी आमदार हरिष पिंपळे यांनी मुंबई येथे राज्याचे जलसंपदा मंत्री ना. गिरीशजी महाजन यांची भेट घेऊन दोन्ही गावांच्या पुनर्वसनाचा विषय सविस्तर मांडला.

या बैठकीत ग्रामस्थांच्या अडचणी, पुनर्वसन प्रक्रियेतील विलंब तसेच नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. यावेळी मंत्री महाजन यांनी विषय गांभीर्याने घेत सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामस्थांना लवकरात लवकर न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

दरम्यान, या बैठकीनंतर ग्राम पोही व रोहना येथील नागरिकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून पुनर्वसनाच्या कामाला आता वेग मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार

### ४० वर्षांपासून वैद्यकीय सेवेत सेवारत




प्रतिनिधी २५ मे

**अकोला :** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात, मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे.

गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे. अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoeopathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे.

मी मनिषा, नाईक होमिओपॅथी मध्ये येण्याअगोदर मला थायरॉईडचा त्रास होता, अंगावर सुज आली होती. वजन वाढले होते. कामात उत्साह नव्हता, चिडचिडपणा वाढला होता. खुप ॲलोपॅथी औषधी घेतली पण काहीच फायदा झाला नाही. नाईक होमिओपॅथी मध्ये ॲडव्हॉन्स होमिओपॅथी उपचार करून दोन महिन्यात मला खुप फायदा झाला. चिडचिड कमी झाली. कामात उत्साह वाटतो. मला ५० टक्के आराम आहे. या उपचाराने मी पुर्णपणे समाधानी आहे.

## नापिकीच्या विवंचनेत शेतकऱ्याची आत्महत्या; भटोरी गावात हळहळ

**मूर्तिजापूर :** तालुक्यातील भटोरी येथे नापिकी व आगामी पेरणीच्या आर्थिक विवंचनेतून एका शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना शनिवारी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मृत शेतकऱ्याचे नाव तुळशीराम भाऊराम कावरे (वय ४२, रा. भटोरी ता. मूर्तिजापूर) असे आहे. ते शेती व्यवसाय करीत होते. मागील वर्षी झालेल्या नापिकीमुळे ते सतत चिंतेत राहत होते. यंदाच्या पेरणीसाठी आवश्यक भांडवल नसल्याने ते आर्थिक विवंचनेत असल्याचे त्यांनी आपल्या नातेवाईकांकडे वारंवार बोलून दाखविले होते. शनिवारी दुपारी सुमारास फिर्यादी श्रावण पुरनदास कावरे यांना अमोल बाळासाहेब टाले यांनी दूरध्वनीवरून माहिती दिली की, तुळशीराम कावरे यांनी त्यांच्या गोठ्यात गळफास घेतला आहे. माहिती मिळताच श्रावण कावरे यांनी घटनास्थळी धाव घेतली. गोठ्यातील टिनाखालील लाकडी बल्लीला साडीच्या पदराच्या साहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत तुळशीराम कावरे दिसून आले.

घटनेची माहिती मिळताच मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणी मर्ग क्रमांक ०९/२६ कलम १९४ बीएनएसएस प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास हेड कॉन्स्टेबल गणेश गावंडे करीत आहेत.

## मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी केले मूर्तिजापूर रेल्वे स्टेशनचे निरीक्षण

प्रतिनिधी २५ मे



**मुर्तिजापूर :** मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांनी २१.०५.२०२६ रोजी भुसावळ विभागातील बडनेरा, नवी अमरावती आणि मूर्तिजापूर रेल्वे स्थानकांचे निरीक्षण करून प्रवासी सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच विविध रेल्वे कामांचा आढावा घेतला. यावेळी विभागीय रेल्वे व्यवस्थापक पुनीत अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बडनेरा येथे क्रू लॉबी, रनिंग रूम तसेच प्रवासी सुविधांची पाहणी करून अधिकाऱ्यांना सुविधा अधिक सक्षम व गुणवत्तापूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नवी अमरावती स्थानकावर स्टेशनवर विकास कामे, स्वच्छता व प्रवासी सुविधांचा आढावा घेण्यात आला.

मूर्तिजापूर येथे महाव्यवस्थापकांनी स्टेशन परिसराची पाहणी केली तसेच 'रुद्र – हॉस्पिटल ऑन व्हील्स' अंतर्गत आयोजित वैद्यकीय शिबिरास भेट देऊन उपलब्ध आरोग्य सेवा व सुविधांची माहिती घेतली. संबंधित अधिकाऱ्यांना रेल्वे कर्मचारी व नागरिकांसाठी अधिक प्रभावी आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

महाव्यवस्थापकांनी बडनेरा ते भुसावळ दरम्यान विंडो ट्रेलिंगद्वारे रेल्वे मार्गाचे निरीक्षण केले. या निरीक्षणादरम्यान ट्रॅकची स्थिती, सिग्नल यंत्रणा, सुरक्षा उपाययोजना, स्थानकांवरील प्रवासी सुविधा, स्वच्छता तसेच रेल्वे पायाभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

## गोवंश तस्करी प्रकरणी युवक ताब्यात; २.४० लाखांचा मुद्देमाल जप्त



प्रतिनिधी २५ मे

**अकोट :** 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत अकोट ग्रामीण पोलिसांनी गोवंशीय प्राण्यांची तस्करी करणाऱ्या आरोपीवर कारवाई करत एक टाटा ऐस मालवाहू वाहन व एक गो-हा असा एकूण २ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी (दि. २४) अकोट ग्रामीण पोलीस पेट्रोलिंग करत असताना एका इसमाकडून टाटा ऐस वाहनातून गोवंशीय प्राणी अंजनगाव रोडमार्गे अकोटकडे नेण्यात येत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार दिवठाणा फाटा येथे पोलिसांनी पंचांसह नाकाबंदी केली. दरम्यान, अंजनगाव रोडवरून येणारे टाटा ऐस वाहन (क्र. एमएच ३० ओबी १०६२) थांबवून तपासणी केली असता वाहनामध्ये एक भुरकट-कथई रंगाचा गो-हा नॉयलॉन दोरीने निर्दयतेने बांधलेल्या अवस्थेत आढळून आला. वाहन चालक आदीन बेग जावेद बेग (वय २१, रा. पणज, ता. अकोट) याच्याकडे संबंधित गोवंशाची कोणतीही कागदपत्रे अथवा पावती आढळली नाही.

यावेळी पोलिसांनी ४० हजार रुपये किंमतीचा गो-हा व २ लाख रुपये किंमतीचे टाटा ऐस वाहन असा एकूण २ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरुद्ध अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम तसेच प्राण्यांना निर्दयतेने वागविणे प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व सहाय्यक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अकोट ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार किशोर जुनघरे, पोउपनि प्रशांत उज्जैनकर, पोउपनि वैभव तायडे तसेच पोलीस कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

## महाराष्ट्रात 'जमीन संरक्षण, लॅन्ड जिहाद प्रतिबंधक कायदा लागू करा

### शिवसेना शहर प्रमुख रमेश गायकवाड यांचे निवेदन

प्रतिनिधी २५ मे



**अकोला :** महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर जमिनीचे व्यवहार, अतिक्रमण, धार्मिक व लोकसंख्यात्मक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने काही ठिकाणी संघटित पद्धतीने जमीन खरेदी-विक्री होत असल्याची भावना सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

त्यामुळे राज्यात जमीन संरक्षण लँड जिहाद प्रतिबंधक कायदा लागू करावा अशी मागणी शिवसेना शहर प्रमुख रमेश गायकवाड यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अनेक राज्यांनी जमिनीचे अवैध हस्तांतरण, अतिक्रमण व संवेदनशील भागातील व्यवहार रोखण्यासाठी कठोर कायदे लागू केले आहेत. गुजरात राज्यात 'Gujarat Land Grabbing (Prohibition) Act, 2020' लागू करण्यात आला असून अवैध जमीन बळकावणे हा गंभीर गुन्हा घोषित करण्यात आला आहे. तसेच गुजरातमधील 'DistuRed Areas Act' अंतर्गत संवेदनशील भागांतील मालमत्ता व्यवहारांसाठी जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी आवश्यक करण्यात आली आहे. आसाम राज्य सरकारने देखील 'Land Jihad' रोखण्यासाठी विशेष कायदा आणण्याची घोषणा केली आहे. काही प्रकारच्या जमीन व्यवहारांसाठी शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक करण्याबाबत भूमिका जाहीर करण्यात आली आहे.

त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही हिंदू समाजाच्या मालमत्ता, मंदिरे, देवस्थान जमिनी, शेतजमिनी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या मालकीच्या जमिनींचे संरक्षण करण्यासाठी कठोर कायदा करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

महाराष्ट्रात 'महाराष्ट्र जमीन संरक्षण व अवैध हस्तांतरण प्रतिबंधक कायदा' तातडीने लागू करावा, कोणत्याही संवेदनशील भागात धर्माधारित लोकसंख्यात्मक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने होणाऱ्या जमिनीच्या व्यवहारांची विशेष चौकशी करण्यात यावी, दोन भिन्न धर्मीय व्यक्तींमधील मोठ्या प्रमाणातील जमीन व्यवहारांसाठी जिल्हाधिकारी, राज्य शासनाची पूर्वपरवानगी बंधनकारक करण्यात यावी, देवस्थान, मंदिर ट्रस्ट, गायरान, शासकीय व सार्वजनिक जमिनीवरील अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अवैधरीत्या ताबा घेतलेल्या जमिनी तातडीने मूळ मालकांना परत मिळाव्यात यासाठी विशेष न्यायालये स्थापन करावी, भूमाफिया, बनावट कागदपत्रे तयार करणारे, दबाव टाकून जमीन खरेदी करणारे यांच्यावर कठोर फौजदारी कारवाई करावी, धार्मिक किंवा संघटित हेतूने जमीन खरेदी करून स्थानिक सामाजिक संतुलन बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर निर्बंध आणावे, महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये जमीन व्यवहारांचे विशेष ऑडिट करण्यात यावे, नागरिकांच्या तक्रारींसाठी 'Land Protection Cell' स्थापन करण्यात यावा. गुजरातप्रमाणे अवैध जमीन बळकावणे हा दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा घोषित करण्यात यावा. महाराष्ट्र सरकारने हिंदू समाजाच्या मालमत्तांचे संरक्षण, सामाजिक संतुलन व कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तातडीने कठोर कायदा लागू करावा, अशी मागणी निवेदनात केली आहे.

## तेल्हारा भाजपा मंडळाच्या वतीने खा. अनुप धोत्रे यांचा वाढदिवस साजरा

प्रतिनिधी २५ मे



**तेल्हारा :** अकोला लोकसभा मतदारसंघात विकासाचा मूलमंत्र घेऊन जनसामान्यांचे प्रश्न सोडवणारे खा. अनुप धोत्रे यांचा वाढदिवस तेल्हारा भाजपा मंडळाच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सामाजिक तथा धार्मिक उपक्रमांचे आयोजन करून भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खा. धोत्रे यांना दीर्घायुष्य लाभो अशी मनोकामना व्यक्त केली.

भाजपाच्या जेष्ठ नेत्या प्रतिभा बरींगे यांच्या मार्गदर्शनात, मंडळ अध्यक्ष गणेश रोठे व न.प. गटनेता अतुल विखे यांच्या कुशल नेतृत्वात सर्वप्रथम तेल्हारा शहराचे आराध्य दैवत असलेले गौतमेश्वर मंदिरात उपस्थित कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते शिवपिंडावर जलाभिषेक करण्यात आला.

तसेच ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप व रामदेव बाबा मंदिरात अपंग बांधवांना अन्नदान करण्यात आले. यावेळी भाजपाचे ज्येष्ठ नेते जेठमल मंत्री, अशोक गोयनका, डॉ. बाबुराव शेळके, भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा जयश्री पुंडकर, गजानन उंबरकार, अनिल पोहने, प्रकाश बरींगे, न.प. उपाध्यक्ष सचिन तायडे, महेंद्र गोयनका, रुपेश राठी, रामेश्वर हागे, शिवा खाडे, राजेश्वर टोहरे, सतीश चहाजगुणे, गणेश काकड, ताराचंद पालीवाल, नगरसेवक सतीश जयस्वाल, नगरसेविका साक्षी वानखडे (पांडव), भक्ती छागाणी, जया बगघन, जितेंद्र पालीवाल, रवी गाडोदिया, ॲड. मनोज एस. राठी, ॲड. पवन शर्मा, अक्षय मोहोड, विशाल ठाकरे, नितीन मोहोड, दीपक छागाणी, छोटू विखे, शामल देशमुख, महेंद्र गुजर, घनश्याम शर्मा, अनिल अवताडे यांच्यासह बहुसंख्य भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थिती होते.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. २५ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# अतिदुर्गम वरपोडातून सचिन नाईक यांच्या कार्याचा श्रीगणेशा

## खा. प्रतिभा धानोरकर टेकड्या चढत पोहोचल्या आदिवासी पोडमध्ये



प्रतिनिधी २५ मे

### वरपोडला भेट देणाऱ्या पहिल्याच खासदार

■ स्वातंत्र्यानंतर प्रथमच वरपोड या आदिवासी गावाला खासदारांनी भेट दिली. अतिदुर्गम भागात येऊन गावकऱ्यांशी आपुलकीने संवाद साधल्याने नागरिक भारावून गेल्याची भावना सरपंच सुभाष कुळमेथे यांनी व्यक्त केली.

**झरी जामणी :** काँग्रेसचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी आपल्या राजकीय कार्याची सुरुवात झरी जामनी तालुक्यातील अतिदुर्गम वरपोड या आदिवासी पोडमधून करत वेगळा संदेश दिला. कार्यक्रमाला चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रतिभा धानोरकर प्रमुख उपस्थित होत्या.

वरपोड येथे जाण्यासाठी रस्ता नसल्याने खासदार, जिल्हाध्यक्ष आणि काँग्रेस कार्यकर्त्यांना रखरखत्या उन्हात टेकड्या चढत जंगलातून अर्धा प्रवास पायी करावा लागला. दाभाडी गट ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामस्थांनी पारंपरिक पद्धतीने स्वागत करत क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांची प्रतिमा भेट दिली.

यावेळी गावातील महिला, लहान मुले आणि नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. ॲड. सचिन नाईक यांनी आदिवासी समाजासाठी काँग्रेस पक्षाने केलेल्या कामांचा आढावा घेत क्षेत्रबंधन कायदा, पेसा कायदा, वनहक्क कायदा, मनरेगा आणि अन्न सुरक्षा अधिकारामुळे आदिवासी समाजाला न्याय मिळाल्याचे सांगितले. जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हा काँग्रेस कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामस्थांनी गावाला जोडणारा रस्ता आणि समाज भवनाची मागणी केली. त्यावर खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी संबंधित विभागांशी चर्चा करून रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. सामाजिक कामांसाठी ग्रामपंचायतीला २० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल गावकऱ्यांनी खासदारांचे आभार मानले.

यानंतर जिल्हाध्यक्षांनी दाभाडी येथील रोजगार हमी योजनेच्या मजुरांशी संवाद साधून रोजगाराच्या प्रश्नावर शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाची भेट घेऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

# गौण खनिज माफियांचा हैदोस

## महसूल पथकावर जेसीबी घालण्याचा प्रयत्न; १२ जणांविरुद्ध गंभीर गुन्हे

प्रतिनिधी २५ मे




**यवतमाळ :** दिग्रस तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून महसूल विभागाच्या पथकावरच जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी दिग्रस पोलीस ठाण्यात १२ जणांविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

माहितीनुसार, २३ मे रोजी रात्री ११.४७ वाजताच्या सुमारास वसंतनगर ते चिंचपात्र मार्गावर अवैधरित्या मुरूम वाहतूक सुरू असल्याची माहिती महसूल विभागाला मिळाली होती. त्यानुसार मंडळ अधिकारी मोहम्मद शरीफ शेख मुनाफ, ग्राम महसूल अधिकारी अशोक साबळे आणि मयूर चौधरी यांनी घटनास्थळी जाऊन ट्रॅक्टर व जेसीबीची तपासणी केली.

तपासणीदरम्यान कोणतीही शासकीय परवानगी नसताना मुरूम वाहतूक सुरू असल्याचे उघड झाले. महसूल पथकाने पंचनामा करण्यास सुरुवात करताच आरोपी आक्रमक झाले. तक्रारीनुसार, जेसीबी चालकाने महसूल अधिकाऱ्यांच्या दिशेने जेसीबी घालण्याचा प्रयत्न करत त्यांचा पाठलाग केला.

घटनेनंतर काही वेळातच आरोपी पुन्हा चार मोटारसायकलींवर १० ते १२ जणांना घेऊन घटनास्थळी परत आले. त्यांच्या हातात लोखंडी रॉड होते. त्यांनी महसूल अधिकाऱ्यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. सरकारी कामात अडथळा निर्माण करून महसूल कर्मचाऱ्यांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न करण्यात आल्याने विभागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी नरेंद्र प्रकाश चव्हाण याच्यासह १२ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहितेनुसार गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दिग्रस पोलिसांनी पुढील तपास सुरू केला असून अवैध गौण खनिज माफियांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# बनावट बियर विक्रीची चर्चा; मद्यप्रेमींच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी २५ मे

**दिग्रस :** शहरातील काही बियर शॉपी व बारमध्ये बनावट अथवा निकृष्ट दर्जाची बियर विक्री होत असल्याची चर्चा सध्या जोर धरत असून, त्यामुळे मद्यप्रेमींच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकाराकडे संबंधित विभाग दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत असून, प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

शहरातील काही ठिकाणी नामांकित कंपन्यांच्या नावाखाली संशयास्पद दर्जाची बियर विकली जात असल्याचे बोलले जात आहे. काही ग्राहकांनी बियरची चव, वास व गुणवत्ता वेगळी असल्याची तक्रार केली आहे. तसेच सेवनानंतर डोकेदुखी, उलट्या, पोटदुखी व अस्वस्थता जाणवल्याचेही काही शौकीनांनी सांगितले. त्यामुळे शहरात विकल्या जाणाऱ्या मद्याच्या गुणवत्तेबाबत गंभीर शंका व्यक्त होत आहेत.



मद्य विक्रीतून शासनाला मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असताना, बनावट मद्य विक्रीसारख्या गंभीर प्रकारांवर ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. “वसुलीत तत्परता; कारवाईत उदासीनता” अशी टीका आता उघडपणे होताना दिसत आहे. शहरातील काही बार व बियर शॉपींमध्ये नियमांचे उल्लंघन होत असल्याचाही आरोप आहे. ग्राहकांना बिल न देणे, मुदत संपत आलेल्या मालाची विक्री करणे तसेच संशयित साठा ठेवणे असे प्रकार सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. मात्र संबंधित अधिकाऱ्यांकडून नियमित तपासणी होत नसल्यामुळे अशा प्रकारांना खतपाणी मिळत असल्याचे बोलले जात आहे. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, बनावट अथवा निकृष्ट दर्जाचे मद्य सेवन केल्यास यकृत, मूत्रपिंड आणि मज्जासंस्थेवर गंभीर परिणाम होऊ शकतात. काही वेळा अशा प्रकारचे मद्य जीवघेणेही ठरू शकते. त्यामुळे नागरिकांनी सावध राहण्याची गरज व्यक्त होत आहे. दरम्यान, शहरातील सर्व बार, परमिट रूम आणि बियर शॉपींची विशेष तपासणी मोहीम राबवून संशयित बियरचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि ग्राहकांची फसवणूक थांबवावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. “पैशासाठी नागरिकांच्या जीवाशी खेळ थांबवा,” अशी संतप्त प्रतिक्रिया शहरातून उमटत आहे.

# टिप्परची दोन दुचाकींना धडक; दोघे ठार

प्रतिनिधी २५ मे

**यवतमाळ :** पुसद–माहूर मार्गावरील इंदिरानगर येथील डंपिंग ग्राउंडजवळ सोमवारी सकाळी भीषण अपघात घडून दोन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक महिला गंभीर जखमी झाली. मालवाहू टिप्परने दोन दुचाकींना जोरदार धडक दिल्याने ही दुर्घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, आज २५ मे रोजी सकाळी साडेसात ते आठ वाजताच्या सुमारास हिरो स्प्लेंडर (क्रमांक ७५७०) आणि हिरो पॅशन (क्रमांक ८३६०) या दोन दुचाकी इंदिरानगर मार्गे पुसदकडे येत होत्या. त्याचवेळी मालवाहू टिप्पर (एमएच २१ बीएच ३७६०) हे वाहनही त्याच दिशेने येत होते. इंदिरानगर येथील डंपिंग ग्राउंडजवळ टिप्परने दोन्ही दुचाकींना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकींवरील तीन व्यक्तींपैकी दोन पुरुषांचा जागीच मृत्यू झाला, तर एक महिला जखमी झाली आहे. अपघातानंतर परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी जमली होती. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शासकीय उपजिल्हा रुग्णालयात हलविण्याची प्रक्रिया सुरू असून जखमी महिलेला उपचारासाठी



दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, मृत व जखमी व्यक्तींची ओळख अद्याप पटलेली नसून

# सामाजिक बांधिलकीतून संजय खाडे यांचा वाढदिवस साजरा

प्रतिनिधी २५ मे

## रक्तदान, वृद्धाश्रम भेटींसह विविध उपक्रम




**वणी :** शेतकरी व कामगार नेते तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव संजय खाडे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. रक्तदान शिबिर, वृद्धाश्रमात साहित्य वाटप, रुग्णालयात फळवाटप तसेच नव्या व्यावसायिक कार्यालयाच्या उद्घाटनामुळे दिवसभर वणीत सामाजिक आणि उत्सवी वातावरण निर्माण झाले होते.

शेतकरी मंदिर येथे सकाळी आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. “रक्तदान हेच श्रेष्ठ दान” या संदेशातून आयोजित शिबिरात युवकांसह नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शिबिरात १०० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले. लाईफलाईन रक्तपेढी यांच्या माध्यमातून रक्त संकलन करण्यात आले.

दुपारच्या सत्रात पळसोनी येथील बाजीराव वृद्धाश्रम येथे वृद्धांना कपडे, चप्पल व दैनंदिन वापराच्या साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधून त्यांना आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळवाटप करून सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश देण्यात आला.

संध्याकाळी खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते “डीएसके कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपर्स” या नव्या व्यावसायिक कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर शेतकरी मंदिर येथे अभिष्टचिंतन सोहळा पार पडला. विविध क्षेत्रांतील मान्यवर, मित्रपरिवार, कार्यकर्ते व नागरिकांनी उपस्थित राहून संजय खाडे यांना शुभेच्छा दिल्या. वणी विधानसभा क्षेत्रातील कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी संजय खाडे फाउंडेशन, जय जगन्नाथ मल्टीस्टेट पतसंस्था, श्री लक्ष्मीनारायण पतसंस्था, काँग्रेस कार्यकर्ते व मित्रपरिवाराने परिश्रम घेतले.

# दिल्लीत एआयसीसी मायनॉरिटी विभागाची राष्ट्रीय सल्लागार परिषद

प्रतिनिधी २५ मे

## संघटन बळकटीकरण, सामाजिक न्याय आणि संविधान संरक्षणावर भर



**यवतमाळ :** ऑल इंडिया काँग्रेस कमिटी च्या मायनॉरिटी विभागाची राष्ट्रीय सल्लागार परिषद नवी दिल्ली येथील इंदिरा भवन, काँग्रेस मुख्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीला काँग्रेसचे वरिष्ठ नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच मायनॉरिटी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष इमरान प्रतापगढी यांच्या उपस्थितीत विविध सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक विषयांवर चर्चा करण्यात आली.

बैठकीला तेलंगणाचे कॅबिनेट मंत्री मोहम्मद अझरुद्दीन, अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण तसेच माजी आमदार वजाहत मिर्झा यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.

बैठकीदरम्यान देशातील अल्पसंख्याक समाजासमोरील विविध प्रश्न, संविधान संरक्षण, सामाजिक न्याय, शिक्षण आणि रोजगाराच्या संधींचा विस्तार यांसह सामाजिक सौहार्द अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने विचारमंथन करण्यात आले. काँग्रेस पक्षाची विचारधारा आणि लोकशाही मूल्ये अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी संघटन मजबूत करण्यावर भर देण्यात आला.

यावेळी उपस्थित नेत्यांनी देशाची एकात्मता, बंधुता आणि समावेशक भारताच्या संकल्पनेला अधिक बळकटी देण्यासाठी काँग्रेस पक्ष कटिबद्ध असल्याचे सांगितले. लोकशाही मूल्यांचे संरक्षण आणि सर्वसमावेशक भारताच्या ध्येयासाठी सामूहिक संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आला. या बैठकीत देशभरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि काँग्रेस नेत्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

# संजय गांधी निराधार योजनेचे मानधन रखडले

प्रतिनिधी २५ मे

## दिव्यांग बांधवांचे उमरखेड तहसीलदारांना निवेदन




**उमरखेड :** तालुक्यातील अनेक दिव्यांग बांधवांना संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत मिळणारे मासिक मानधन एप्रिल महिन्यापासून अद्यापपर्यंत मिळाले नसल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. शासनाच्या सर्व नियमांचे पालन करूनही खात्यात पैसे जमा न झाल्याने उपासमारीची वेळ आल्याचा आरोप करत दिव्यांग बांधवांनी उमरखेडचे तहसीलदार राजेंद्र सुरडकर यांना निवेदन दिले.

शासनाने निराधार, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दिव्यांग व्यक्तींना आधार मिळावा यासाठी संजय गांधी निराधार योजना सुरू केली आहे. मात्र, उमरखेड तालुक्यातील अनेक लाभार्थ्यांचे मानधन गेल्या काही महिन्यांपासून रखडल्याचे समोर आले आहे. संबंधित लाभार्थ्यांनी शासनाच्या सूचनेनुसार आवश्यक कागदपत्रे, संलग्नीकरण प्रक्रिया तसेच बँक खात्याची जोडणी वेळेत पूर्ण केली होती. सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करूनही एप्रिल महिन्यापासून त्यांच्या खात्यात एकही रुपया जमा झालेला नसल्याची तक्रार निवेदनातून करण्यात आली आहे.

मानधन तात्काळ जमा करून संबंधित प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. निवेदन देताना राजेश रुडे, विजय शिंदे, डेंगे, फजल खान, शेख इरफान, मोहम्मद आयुब, दीपक पवार, शेख मुनाब यांच्यासह अनेक दिव्यांग बांधव उपस्थित होते.

### दैनंदिन गरजा भागविणे कठीण

■ सध्याच्या महागाईच्या काळात शारीरिक आणि आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या दिव्यांग बांधवांचे मानधन थांबल्यामुळे त्यांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. औषधोपचार, किराणा तसेच इतर आवश्यक खर्च कसे भागवायचे, असा गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला असून लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे.

# आर्णी डेपोत बस पाससाठी विद्यार्थ्यांची फरफट; उपनगराध्यक्ष निलेश गावंडे आक्रमक

प्रतिनिधी २५ मे

**आर्णी :** स्थानिक बस डेपोमध्ये विद्यार्थ्यांना वेळेवर बस पास मिळत नसल्याच्या तक्रारींवरून उपनगराध्यक्ष निलेश गावंडे यांनी सोमवारी आक्रमक भूमिका घेत डेपो प्रशासनाला जाब विचारला. विद्यार्थ्यांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत असून, कर्मचाऱ्यांच्या उदासीन कारभारामुळे विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून तालुक्यातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बस पास मिळवण्यासाठी वारंवार डेपोच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. तांत्रिक अडचणी, अपुरी कर्मचारी व्यवस्था आणि दिरंगाईमुळे पास वितरण प्रक्रिया संथ झाल्याचे चित्र आहे. अनेक विद्यार्थ्यांना सकाळपासून रांगेत उभे राहूनही पास मिळत नसल्याने शैक्षणिक कामांवर परिणाम होत असल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. यावेळी काही विद्यार्थ्यांनी पास खिडकीवर चौकशीसाठी गेल्यानंतर कर्मचाऱ्यांकडून समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची तसेच उद्धट वागणूक दिली जात असल्याची तक्रार केली.



विद्यार्थ्यांच्या या समस्या ऐकल्यानंतर उपनगराध्यक्ष निलेश गावंडे यांनी डेपो प्रशासनाशी थेट संवाद साधत नाराजी व्यक्त केली. “विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. त्यांना बस पाससारख्या मूलभूत सुविधेसाठी खेटे मारावे लागत असतील, तर हे अजिबात सहन केले जाणार नाही. संबंधित कर्मचाऱ्यांनी आपली कार्यपद्धती सुधारून विद्यार्थ्यांना तातडीने बस पास उपलब्ध करून द्यावेत,” असा इशारा त्यांनी दिला.

दरम्यान, डेपो प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या अडचणीची दखल घेत बस पास वितरण प्रक्रिया अधिक गतिमान करण्याचे तसेच विद्यार्थ्यांना कोणतीही गैरसोय होऊ न देण्याचे आश्वासन दिले. या प्रकरणामुळे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

सिटी न्यूज अमरावती
सोमवार, दि. २५ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## तळेगाव दशासर पोलीस स्टेशन कडुन अवैध रेती वाहतुकीवर कारवाई

**अमरावती :** पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी पो स्टे हददीत वरली जुगार, अवैध दारु विक्री, गावठी हातभटटी व अवैध रेती वाहतुक, गोवंश वाहतुक यांचे विरुदध कठोर कारवाई करणे बाबत सर्व ठाणेदार यांना आदेशित केले आहे. त्यानुसार आज दिनांक २४/०५/२०२६ रोजी रात्री पोलीस स्टेशन तळेगाव दशासर येथील पोलीस अधीकारी व पोलीस अमंलदार यांचे पथक पो स्टे हददीमध्ये अवैध धंदयाचे विरुध्द कारवाई करणे करीता गस्त करीत असतांना मिळालेल्या गोपनिय माहीतीवरुन ०७०० वाजण्याचे सुमारास तळेगाव बसस्टॉप येथे पंचासह कारवाई केली असता एक टाटा ट्रक (हायवा) क्रमांक Mh 28 BB 6066 मिळुन आल्याने पंचासमक्ष त्याची पाहणी केली असता त्यामध्ये विनारॉयल्टी १० ब्रास काळी रेती मिळुन आली. त्यामुळे ५०,००,०००/- रुपयांचा ट्रक व १,२०,०००/- रुपयांची १० ब्रास रेती असा एकुण ५१,२०,०००/- रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

# व्यक्ती निर्माण ते राष्ट्र निर्माण हाच जागतिक महासत्ता बनवण्याचा मार्ग- डॉ. बोंडे

प्रतिनिधी २५ मे

◆ १० वी आणि १२ वीच्या गुणवंतांचा ऐतिहासिक गौरव सोहळा
◆ परिसरातील हजारो नागरिक, पालक आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती



**दर्यापूर:** 'देशाचा विकास करायचा असेल तर सर्वात आधी तरुणांचे चारित्र्य आणि व्यक्ती निर्माण होणे गरजेचे आहे. 'व्यक्ती निर्माण ते राष्ट्र निर्माण' हाच भारताला जागतिक महासत्ता बनवण्याचा एकमेव मार्ग आहे. जेव्हा या देशातील युवा पिढी सक्षम, सुशिक्षित आणि राष्ट्रप्रेमाने प्रेरित होईल, तेव्हाच 'समर्थ युवा, समर्थ भारत' हे स्वप्न प्रत्यक्षात उतरेल,ठ असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केले. दर्यापूर तालुक्यातील येवदा येथे 'स्वयंम मल्टीपर्पज फाउंडेशन'च्या वतीने इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या ऐतिहासिक आणि अत्यंत दिमाखदार सोहळ्याला मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. आपल्या ओघवत्या आणि प्रेरणादायी भाषणात खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी राष्ट्रनिर्माणात तरुणांच्या भूमिकेवर विशेष प्रकाश टाकला. विविध महापुरुषांची उदाहरणे देत त्यांनी उपस्थित तरुणाईमध्ये नवा जोश भरला. ते म्हणाले की, ठस्वामी विवेकानंदांनी सांगितलेला 'उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्तीशिवाय थांबू नका' हा मंत्र आजच्या डिजिटल युगातही तितकाच लागू पडतो. तरुणांनी केवळ स्वतःच्या प्रगतीचा विचार न करता राष्ट्रहिताला प्राधान्य दिले पाहिजे. क्षमतेचा वापर देशासाठी करणे हीच खरी देशभक्ती आहे.

पुढे बोलताना त्यांनी मिसाईल मॅन डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या 'विंग्स ऑफ फायर' (अग्निपंख) चा दाखला दिला. ठडॉ. कलाम यांनी नेहमीच तरुणांना मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम घेण्याची शिकवण दिली. कलामांचे जीवन हे व्यक्ती निर्माणातून राष्ट्र निर्माण कसे होते, याचे जिवंत उदाहरण आहे,ठ असे डॉ. बोंडे यांनी नमूद केले. त्यांच्या या मांडणीने आणि राष्ट्रकेंद्री विचारसरणीने कार्यक्रमाला उपस्थित शेकडो तरुण आणि विद्यार्थी कमालीचे आकर्षित झाले.

**दर्यापूर-येवदा परिसरातील गुणवंतांचा गौरव**

या सोहळ्यात येवदा परिसरातील ग्रामीण भागातील शेकडो गुणवंत मुला-मुलींचा सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. आपल्या ग्रामीण भागातील मुलांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेले यश कौतुकास्पद असून, हेच विद्यार्थी उद्याच्या सशक्त भारताचे शिल्पकार आहेत, असा विश्वास डॉ. बोंडे यांनी व्यक्त केला.

**'शिवाजी संस्थे'च्या स्पर्धा परीक्षा अकॅडमीतून शेकडो अधिकारी घडताहेतः हेमंत काळमेघ**

शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी तळागाळातील सर्वसामान्य आणि गोरगरीब नागरिकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे मोलाचे कार्य केले. त्यांच्या याच दूरदृष्टीमुळे आज आपला समाज प्रगतशील आणि सुशिक्षित म्हणून ओळखला जातो,ठ असे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारी सदस्य हेमंत काळमेघ यांनी यावेळी केले. शिक्षणापासून एकही गरजू वंचित राहू नये, यासाठी गोरगरीब नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना आवश्यक ती सर्व मदत श्री शिवाजी शिक्षण संस्था करेल, असे आश्वस्त त्यांनी यावेळी केले. पुढे बोलताना हेमंत काळमेघ यांनी सांगितले की, 'भाऊसाहेबांचा हाच वारसा पुढे चालवत संस्थेने स्पर्धा परीक्षेच्या क्षेत्रातही मोठे पाऊल टाकले आहे. डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा अकॅडमीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेकडो विद्यार्थी आज विविध उच्च पदांवर अधिकारी म्हणून विराजमान होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# छत्रपती संभाजी महाराजांचे कार्य युवकांसाठी प्रेरणादायी - आ.रवि राणा

प्रतिनिधी २५ मे



**अमरावती:** धर्मवीर, स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बडनेरा नवीवस्ती येथील छत्रपती संभाजी नगर परिसरात आमदार रवि राणा यांच्या प्रयत्नातून व मंजूर निधीतून करण्यात आलेल्या छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमा परिसरातील सौंदर्यीकरण कामाचे लोकार्पण मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी परिसर भगवेमय झाला असून 'जय भवानी, जय शिवाजी' च्या घोषणांनी संपूर्ण वातावरण दणाणून गेले होते.

कार्यक्रमाला हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी, शिवभक्त, युवक-युवती, महिला तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात आणि भगव्या ध्वजांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार रवि राणा म्हणाले की, 'छत्रपती संभाजी महाराज हे हिंदू धर्माचे खरे धर्मरक्षक होते. औरंगजेबाच्या अमानुष अत्याचारासमोर त्यांनी धर्मांतर नाकारत हिंदवी स्वराज्य आणि हिंदू धर्माच्या रक्षणासाठी बलिदान दिले. त्यांचे शौर्य, त्याग आणि राष्ट्रभक्ती आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी आहे. प्रत्येक युवकाने संभाजी महाराजांच्या विचारांवर चालत धर्मरक्षण, राष्ट्रसेवा आणि समाजहितासाठी कार्य केले पाहिजे'.

ते पुढे म्हणाले की, 'छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास हा केवळ पराक्रमाचा नाही तर हिंदुत्वाच्या अभिमानाचा इतिहास आहे. हिंदू संस्कृती आणि स्वाभिमान टिकवण्यासाठी त्यांनी दिलेले बलिदान सदैव स्मरणात राहील. युवकांमध्ये राष्ट्रभक्ती आणि हिंदुत्वाची भावना जागृत करण्यासाठी अशा ऐतिहासिक स्थळांचे जतन व सौंदर्यीकरण करणे गरजेचे आहे.

या सौंदर्यीकरणामध्ये प्रतिमा परिसराची आकर्षक सजावट, फरशीकरण, परिसर स्वच्छता तसेच हरितीकरणाची कामे करण्यात आली आहेत. त्यामुळे परिसर अधिक आकर्षक व प्रेरणादायी बनला असून नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित शिवभक्तांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जयघोषात हिंदुत्व आणि राष्ट्रभक्तीचा संदेश दिला. तसेच भविष्यातही हिंदू संस्कृती, इतिहास आणि महापुरुषांच्या स्मारकांच्या जतनासाठी कार्य सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. यावेळी नगरसेवक अजय जयस्वाल, मिनी महापौर किशोर जाधव, नगरसेविका गौरी मेघवानी, नगरसेविका रजनी डोंगरे, पवन भिंडा, पंकज शर्मा, मुस्ताकभाई, आदिची उपस्थिती होती.

# भारत - मलेशिया देशांच्या संयुक्त संशोधन प्रकल्प

## थर्ड इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ॲडव्हान्सिंग सस्टेनेबल डेव्हलपमेंट या आंतरराष्ट्रीय परिषदेचा अत्यंत दिमाखदार समारोप

प्रतिनिधी २५ मे

**अमरावती :** दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती, अकॅडीवेट रिसर्च फाउंन्डेशन आणि मणिपाल विद्यापीठ, मेलाक्का, मलेशिया यांच्या संयुक्त विद्यमाने मणिपाल विद्यापीठाच्या अत्याधुनिक आणि निसर्गरम्य परीसरात थर्ड इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन ॲडव्हान्सिंग सस्टेनेबल डेव्हलपमेंट या आंतरराष्ट्रीय परिषदेचा अत्यंत दिमाखदार समारोप संपन्न झाला. दोन दिवस चाललेल्या या परिषदेत भारतासह विविध देशांतील संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींनी सहभाग नोंदवून शाश्वत विकास, जैवविविधता, हरित तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, जैव-सूचनाविज्ञान, परिसंस्था संवर्धन आणि पर्यावरणीय संशोधन या विषयांवर आपले संशोधन सादर केले.

परिषदेच्या उद्घाटन समारंभाची सुरुवात भारत आणि मलेशिया या दोन्ही देशांच्या राष्ट्रगीताने राष्ट्राभिमान आणि स्वाभिमानाच्या उत्स्फूर्त वातावरणात झाली. उद्घाटन समारंभाला मणिपाल युनिव्हर्सिटी कॉलेज, मेलाक्का, मलेशियाचे व्हाइस-चान्सलर प्रा. डॉ. जयकुमार गुरुसामी तसेच प्रो व्हाइस-चान्सलर प्रा. डॉ. अब्दुल रशीद बिन इस्माईल यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

परिषदेच्या आयोजनासाठी महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष श्री हर्षवर्धनजी देशमुख तसेच स्व. दिगंबरराव बिंदू स्मारक समिती, भोकरचे अध्यक्ष डॉ. माधवरावजी किंहाळकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकरचे प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण आणि श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे यांच्या नेतृत्वाखाली परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. परिषदेच्या संयोजनाची धुरा भारताच्या वतीने डॉ. अरविंद चव्हाण आणि डॉ. दिनेश खेडकर यांनी तर मलेशियाच्या वतीने डॉ. बाला आणि डॉ. कालीदासन यांनी प्रभावीपणे सांभाळली.

परिषदेमध्ये विविध तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या तांत्रिक सत्राचे चेअरपरसन म्हणून असोसिएट प्रा. डॉ. मधन आणि असोसिएट प्रा. डॉ. संबित दाश यांनी काम पाहिले. दुसऱ्या तांत्रिक सत्राचे चेअरपरसन प्रा. डॉ. प्रकाश चंद्र शेट्टी आणि असोसिएट प्रा. डॉ. शर्ली डेबोरा जॉर्ज होते. तिसऱ्या तांत्रिक सत्रासाठी प्रा. डॉ. सान्दा आंग आणि डॉ. अरविंद चव्हाण यांनी अध्यक्षस्थान भूषविले. चौथ्या तांत्रिक सत्राचे चेअरपरसन प्रा. डॉ. जमाल मोईदीन मुथू मोहम्मद आणि असोसिएट प्रा. डॉ. मार मार ल्विन होते. समारोपपूर्व प्रमुख व्याख्यान सत्रासाठी प्रा. डॉ. रेखा प्रभू आणि डॉ. दिनेश दयाराम खेडकर यांनी चेअरपरसन म्हणून कार्य केले.

परिषदेत एकूण सहा प्रमुख बीजभाषणे आयोजित करण्यात आली. यामध्ये प्रा. डॉ. अँटोनी व्हिन्सेंट सामरोट, प्रा. डॉ. यू लिह जियुन, प्रा. डॉ. दिनेश डी. खेडकर, प्रा. डॉ. पालसन सन्नासी अब्दुल्लाह, श्री कासिराजन कासिपांडियन आणि सिनियर असोसिएट प्रा. डॉ. सुब्रमणि परसुरामन यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

मलेशिया येथे आयोजित ॲडव्हान्सिंग सस्टेनेबल डेव्हलपमेंट या तिसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत यशस्वी सांगता झाली. दोन दिवस चाललेल्या या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये शाश्वत विकास, जैवविविधता, जैवतंत्रज्ञान, हरित तंत्रज्ञान, पर्यावरणीय संवर्धन, कृत्रिम बुद्धिमत्ता, जैव-सूचनाविज्ञान, वैद्यकीय संशोधन, कृषी नवोपक्रम आणि परिसंस्था संरक्षण यांसारख्या विविध विषयांवर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी आपले संशोधन मांडले.

परिषदेच्या पहिल्या दिवशी विविध तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. मणिपाल युनिव्हर्सिटी कॉलेज मलेशिया येथील संशोधन व्यवस्थापन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. अँटोनी व्हिन्सेंट सामरोट यांनी पिगमेंट्स अँड देअर बेनिफिट्स या विषयावर प्रमुख व्याख्यान दिले. ग्रामीण भारतातील महिला उद्योजकता, मायक्रोप्लास्टिक प्रदूषण, हवामान बदल, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित शाश्वत विकास, वनस्पती आधारित प्रतिविष संशोधन, जैवचिन्हे आणि मेलघाटातील वन्य खाद्य वनस्पतींची विविधता यांसारख्या विषयांवर संशोधन सादरीकरणे झाली.

# महसूल विभागाने जबाबदारी घेऊन कार्य करावे-अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे

प्रतिनिधी २५ मे

## महसूल विभागाच्या विविध कार्यालयांना भेटी



**अमरावती:** महसूल विभाग हा समाजासाठी कार्य करणारा विभाग आहे. त्यामुळे विविध परिस्थितीमध्ये अनपेक्षित जबाबदाऱ्या या विभागावर येतात. मात्र जनतेसाठी कार्य करावयाचे असल्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जबाबदारी घेऊन कार्य करावे, असे आवाहन अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज खारगे यांनी महसूलच्या अधिकाऱ्यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंदा दानेज आदी अधिकारी उपस्थित होते.

श्री. खारगे यांनी महसूलमधील अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस दौरा करावा. यामुळे प्रशासनावर पकड मजबूत करण्यास मदत होणार आहे. दौरा करताना विविध विकासकामांची तपासणी केल्यास तथ्य जाणून घेण्यास मदत मिळणार आहे. त्यासोबतच जनतेशी भेटावे. त्यांनी दिलेल्या निवेदनांवर सकारात्मक कारवाई करावी. निवेदनावर केलेली कारवाई कळवावी. यामुळे नागरिकांच्या अडचणी लक्षात येतात. हे सर्व करीत असताना अधिनस्त कर्मचाऱ्यांशी संवाद साधून समस्याही जाणून घ्याव्यात. प्रशासनाने नागरिकांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करावा. नागरिकांच्या समस्या, तक्रारींचा निपटारा करण्यासाठी व्यवस्था निर्माण करावी. त्यांच्या तक्रारींचा मागोवा घ्यावा. शासनने ईज ऑफ डुइंग बिझनेसचे धोरण स्विकारले आहे. त्यानुसार १२ दुरूस्ती करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी जिल्ह्याची संक्षिप्त माहिती दिली. जिल्हा प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणारे विविध उपक्रमांची माहिती त्यांनी यावेळी दिली. प्रामुख्याने जिल्ह्यात लोकसहभागातून निर्माण करण्यात येणाऱ्या पांदन रस्त्याची माहिती दिली. तसेच रहिवासी जमिन नियमानुकूल करणे, पट्टेवाटप करणे, मिळकत पत्रिका वाटप करणे याबाबत माहिती दिली.

# गुरुकुल व्यायाम शाळा येथे ११ वे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न




प्रतिनिधी २५ मे

**अमरावती :** गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था अमरावती व वॉरीअर्स स्पोर्ट्स अँड मल्टीपर्पज अकादमी अमरावती द्वारा उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिर - २०२६ वर्ष ११ वे चे आयोजन दिनांक २६ एप्रिल ते १६ मे २०२६ सकाळी ७ ते १०.३० या वेळेत करण्यात आले होते. शिबिरात विद्यार्थ्यांना कराटे, लाठी काठी, बालसंस्कार, योगासन, धनुर्विद्या, आर्ट अँड क्राफ्ट, चित्रकला आदी विषयांचे प्रशिक्षण देण्यात आले होते.

शिबिराच्या निरोप समारंभाकार्यक्रमा प्रसंगी गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था अमरावतीचे अध्यक्ष तुषार भारतीय, वॉरीअर्स स्पोर्ट्स अँड मल्टीपर्पज अकादमी अमरावतीचे सचिव व शिबिराचे आयोजक सेन्सेई उमेश भा. मोवळे, चेतन वाटणकर, कराटे प्रशिक्षक विशाल चव्हाण, आशिष वाघमारे, लाठी काठी प्रशिक्षक पिंकी प्रजापती, बालसंस्कार व योगासन शिक्षिका छाया जंगले, धनुर्विद्या पवन तांबट, आर्ट अँड क्राफ्ट शीतल गुप्ता व चित्रकला अखिलेश काळमेघ आदीच्या उपस्थित कार्यक्रम संपन्न झाला. शिबिरात उत्कृष्ट प्रशिक्षण प्राप्त करणारे विद्यार्थी मुलांमध्ये मनन वासानी प्रथम, अधिराज क्षीरसागर द्वितीय, तनिष्क मोवळे तृतीय व मुलींमधे अद्रिका ठाकरे प्रथम, शिवांशी देशमुख द्वितीय, नीरजा देशपांडे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# अमरावतीत विधान परिषदेच्या निवडणुकीला चढला रंग

## भाजपतर्फे प्रवीण पोटे, डॉ. नितीन धांडे दावेदार, युवा स्वाभिमानतर्फे सुनील राणा यांची एंट्री, काँग्रेसअद्याप सस्पेन्स

प्रतिनिधी २५ मे



**अमरावती :** अमरावतीत सध्या होऊ घातलेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीला रंग चढू लागला आहे.

भाजपाच्या वतीने विधान परिषदेचे माजी आमदार प्रवीण पोटे, भाजपाचे विद्यमान अमरावती शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे हे भाजपाच्या वतीने दावेदार मानले जात आहे तर महायुतीत समाविष्ट असलेल्या युवा स्वाभिमान पक्षाच्या वतीने आमदार रवी राणा यांचे बंधू सुनील राणा युवा स्वाभिमान तर्फे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याने निवडणुकीची चुरस वाढली असून काँग्रेसने मात्र अद्याप आपला उमेदवार जाहीर केला नसला तरी काँग्रेसचे बडे नेते चुप्पी साधून आहेत.

विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मत दारसंघाच्या निवडणुकीत भाजपकडून प्रवीण पोटे हे प्रमुख दावेदार आहेत. परंतु या निवडणुकीत राणा दाम्पत्याने उडी घेत आ. रवी राणा यांचे मोठे बंधू सुनील राणा यांचे नाव पुढे केल्याने भाजप पक्षश्रेष्ठीपुढेही पेच निर्माण झाला आहे. परंतु भाजपने पोटे यांना डावलले तरीही त्यांना भाजप किंवा समर्थीत उमेदवाराचेच काम करावे लागणार आहे. मात्र या निवडणुकीत काँग्रेसची भूमिका निर्णायक ठरणार आहे. विधानपरिषदेच्या अम रावती स्थानिक स्वराज्य या मतदारसंघाची निवडणूक १८ जून रोजी होणार आहे. निवडणुकीसाठी एकूण ४५३ मत दार आहेत. भाजपचे प्रवीण पोटे यांनी या मतदारसंघाचे सलग दोनदा प्रतिनिधीत्व केले आहे. तरीही ते भाजपचे तेच उमेदवार असतील हे जवळजवळ निश्चित मानले जात असतानाच भाजप नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी पोटे यांच्या उमेदवारीला उघड उघड विरोध सुरु केला आहे. नितीन धांडे यांचे नाव पुढे करून त्यांनी पालकमंत्र्यांचे उपस्थितीत नितीन धांडे यांच्या वाढदिवसाच्या दिनी त्यांच्या नावाची गुगली टाकली होती. मात्र भाजपचे एका गटाकडून डॉ. नितीन धांडे यांचा नावाचा विरोध होत असतानाच आता आ. रवी राणा यांचे बंधू सुनील राणा यांचे नाव पुढे केले आहे. एवढ्यावरच न थांबता काँग्रेस पक्ष प्रबळ उमेदवाराच्या शोधात असताना काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सुनील राणा यांना शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी पाठविले, 'गिला शिकवा भुल जावो', म्हणत सुनील राणा यांच्याकडून मनधरणी करण्यात आली. 'राणा है तो सब मुमकीन है', असे म्हणत काँग्रेस जणांनाही यांचे फारसे अप्रूप वाटले नसावे. भाजपकडून प्रवीण पोटे यांची उमेदवारी जवळ जवळ निश्चित मानली जात असताना अचानक राणा दाम्पत्याने यात उडी घेऊन पोटे यांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे. सुनील राणा यांना या निवडणुकीत उमेदवार म्हणून उभे करण्याची त्यांनी तयारी चालवली आहे. पोटे व राणा हे दोघेही तगडे उमेदवार आहेत. भाजपा मध्ये नवनीत राणा यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्यापर्यंत थेट संबंध आहे. त्यामुळेच अमरावती लोकसभा निवडणुकीत भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून त्यांच्या उमेदवारीला प्रचंड विरोध होत असतानाही त्यांनी भाजपच्या उमेदवारीवर निवडणूक लढवली. एवढेच नव्हे तर त्या आता भाजपच्या नेत्या आणि स्टार प्रचारक म्हणून भाजपने त्यांना स्वीकारले आहे.

**प्रवीण पोटे यांची प्रचार फेरी पूर्ण, प्रतीक्षा मतदानाची !**

अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून सलग दोनदा विजय झालेले प्रवीण पोटे यांनी या मतदारसंघात आपले चांगले पाय रोवले आहे. नगरसेवकांना आपल्या प्रभागातील विकास कामासाठी त्यांनी निधी उपलब्ध करून दिला. वैयक्तिक संबंधही त्यांनी जोपासले आहे. त्यांच्याकडे मदतीसाठी आलेल्या कुणालाही ते रित्या हाताने पाठवीत नाही. भाजपच्या स्थानिक पातळीवरही त्यांचे सलोख्याचे संबंध आहेत. त्यामुळेच यावेळीही भाजपची उमेदवारी आपल्यालाच मिळणार या प्रबळ इच्छाशक्तीने त्यांनी आपल्या प्रचाराची अंतिम फेरी पूर्ण केली आहे. या निवडणुकीत मतदार असलेल्या नगरसेवकांच्या गाठीभेटी घेणे पूर्ण झाले आहे. आता केवळ मतदानाच्या तारखेची त्यांना प्रतीक्षा आहे.



# कर्मयोध्दा चंद्रकांतदादा




## युवा नेतृत्व

# सदा सर्वदा...

# विकासाचा वादा चंद्रकांत दादा

सिंहाच्या छाव्याला संघर्ष शिकवावा लागत नाही, तो अंगभूत त्यांच्या रक्तांत असतो, परंतु या छाव्याला मोठे होत असतांना संघर्ष करूनच आपली वाट मळावी लागते, व्यक्तीचा ध्याय अविरत श्रमासाठी प्रेरित करीत असतो, या प्रेरणेला श्रम चिकाटी सातत्य व अनुभवाचे बळ मिळाले की, प्रगतीची शिखरे सर होतातच. ती व्यक्ती समाजाचे नेतृत्व करते जे सर्व मान्य असते, असेच एक नेतृत्व सर्व सामान्य कार्यकर्ते, लोकांच्या मनावर अधिराज्य जागविणारे तरुण नेतृत्व म्हणजेच आदरणिय दादासाहेब त्यांचा वाढदिवस आज सुवर्ण महोत्सव म्हणून साजरा होत आहे.

















युवा उसे कहते है , जो तुफानो से डरते नही, बल्की तुफानो का रुख बदल देते है...असेच काहीसे चंद्रकांत दादा ठाकरे यांच्याविषयी म्हणावे लागेल. थलेही दादांना पांरपारीक राजकीय वारसा लाभला असला तरी, त्यांनी त्यांच्यातील प्रचंड ईच्छाशक्ती व आत्मविश्वासाच्या जोरावर आपले वर्चस्व सिध्द करुन दाखविले त्यांनी केलेल्या दैदिप्यमान व नेत्रदिपक कामगिरीमुळे आज ते संपुर्ण जिल्हयात दादा म्हणून ओळखले जातात.

समाजकारण आणि राजकारणाचा वारसा त्यांना त्यांच्या कुटुंबातूनच मिळाला. परंतू तो तेवढयाच नेटाने पुढे नेण्याच कसब त्यांच्यात उपजच होते. जिल्हा परिषदेच्या शाळेतून आपल्या शिक्षणाला प्रारंभ करणारे चंद्रकांत ठाकरे यांनी अकोला येथील कॉलेज ऑफ अॅग्रीकल्चर मधून बीएसस्सी प्राविण्य आहेत. महाविद्यालयात शिक्षण घेत असतांनाच ते विविध सामाजिक कार्यात आघाडीवर राहत. ते नेहमीच आपल्या मित्र परिवाराला आलेल्या अडचणी सोडविण्यासाठी कॉलेज जिवनापासुन आघाडीवर होते. यातुनच पुढे नोकरी करण्याएैवजी आपण आपल्या गाव, परिसरासाठी काही तरी केलं पाहीजे म्हणून समाजसेवेचा वसा हाती घेतला, अनेक संकटांचा सामना त्यांनी स्मित हास्याने व प्रचंड कष्टातून एक एक पराक्रम स्वताच्या नावावर रेखाटला. चिकित्सक वृत्ती व प्रचंड निरीक्षणक्षमता ही चंद्रकांत ठाकरे यांची जमेची बाजु. त्यांच्यात अभ्यासू वृत्ती असल्यानेच प्रत्येक गोष्टीचा त्यांना दांडगा अभ्यास आहे. मग ते समाजकारण असो वा राजकारण त्याचा खोलवर अभ्यास करुन समाजातील शेवटच्या घटकापर्यत न्याय देण्यासाठी ते कुठलेही फायदे तोटे विचारात न घेता, लढतात. झटतात. ही त्यांची खास शैली.

सगळ जग आपल्या घरटयात विसावलं. जे स्वता:ला जनतेचे सेवक समजून वावरणारे आमदार, खासदार, गाव पुढारीही भुमिगत झाले. परंतू राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी जि.प. अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे अधिक जोमाने घराबाहेर पडून समाजाबांधवाचे पाठीराखे बनले.

जिल्हा परिषद गावामध्ये ग्रामसमित्या ग्राम समिती निर्माण करुन गावातील स्वच्छता फवारणी करुन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था त्याचबरोबर गावात बाहेरुन येणा-विविध संघटनाच्या माध्यमातून राष्ट्रवादीच्या जिल्हयातील पदाधिकाज्यांनी विशेष भुमिका बजावली. कोरोनाच्या काळात आपला जीव धोक्यात घालुन अहोरात्र सेवा देणा-या अंगणवाडी सेविका, मदतनिस व आशा वर्कर यांना १४ व्या वित्त आयोगातून प्रत्येकी एक हजार रुपये प्रोत्सहन भत्ता व २५ लाखाचे विमा कवच प्रदान केले. जिल्हा सोयाबीन हब म्हणून परिचित आहे. परंतू चुकीच्या पध्दतीची बियाणे पेरल्यामूळे उत्पन्न कमी होउन शेतकज्याचे नुकसान होते. ही बाब हेरुन घरगुती बियाण्यावर प्रक्रिया करुन त्याची उगवन क्षमता तपासून पेरणी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून उमेद अभियान अंतर्गत ९२ ग्रामसंघ, १७८६ समुहा सोबत गाव पातळीवर माती परिक्षण व बिज प्रक्रीया करण्याचे प्रयत्न सुरु असून आपला जिल्हा सुजलाम सुफलाम करण्यासाठी प्रयत्नाची ते पेरणी करीत आहेत. युवकांना सोबत घेउन चालणारा माठया मनाचा दादा कोरोनाच्या काळात रक्ताचा पडलेला प्रचंड तुटवडा जिल्हाभरात रक्तदान शिबिरे आयोजित केले. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष बनल्यानंतर जि.प.प्रशासन गतिमान केले. इमारत परिसरातील अस्वच्छता व घान नष्ट करुन जि.प.ची रंगरंगोटी केली.परिसरात वाहन स्थळे तयार करुन बेशिस्त वाहनांना शिस्त लावली. रिक्त पदाचा आढावा घेऊन सर्व पदे भरण्यासाठी आंदोलनाचे हत्यार उपसले.यासंदर्भात थेट मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, मुख्य सचिव वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा केला.





कार्यालय नेटाने कार्य पेलत होते. संकटाच्या काळात जे विद्यार्थी शिक्षणासाठी बाहेरगावी गेलेले होते. त्या विद्यार्थ्याची माहिती सोशल मिडियावर एकत्र करुन स्थानिक राष्ट्रवादीच्या पदाधिकारी व जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून मदत व सहकार्य केले. स्वस्त धान्य दुकानाच्या माध्यमातून मिळणारे धाण्य ग्रामीण भागातील होतकरु लाभार्थ्यापर्यत पोहचण्यासाठी राष्ट्रवादीच्या पदाधिकाज्यामार्फत पोहचविण्यास मदत केली.

जिल्हयातील भाजीपाला व फळ उत्पादक शेतक-यांचा माल थेट ग्राहकापर्यत पोहचण्यासाठी जिल्हा कुषी अधिक्षक यांच्या मार्फत शहरांच्या वेगवेगळया भागात शेतकरी सेवा केंद्र उभारुन थेट विक्री करुन शेतक-यांच्या मालाला योग्य भाव मिळण्यासाठी सहकार्य केले.डॉक्टरसेलच्या माध्यमातून गरजु रुग्नांना आरोग्य सेवा हेल्पलाईन नंबर देवुन त्यांची आरोग्य तपासणी करुन आवश्यक ती रुग्न व सेवा औषध पुरवठयाचे कार्य केले. त्याचबरोबर जिल्हयातील रुग्नांना लॉकडाउनच्या काळात रक्त पुरवठा कमी पडू नये म्हणून जिल्हयाच्या विविध भागामध्ये प्रशासनाच्या सहकार्यांने रक्तदान शिबिर आयोजित करुन जवळपास मोठया प्रमाणावर रक्तबॉटल रक्त संकलित करुन आपले सामाजिक ॠण फेडले. बाजार समित्या बंद असल्यामुळे शेतकज्यांचा माल तसाच पडून होता. त्याबाबत तातडीने वरिष्ट स्तरावर पाठपुरावा करीत बाजार समित्या मार्फत ऑनलाईन नोंदणी घेवून शेतक-यांचा माल दररोज बाजारपेठेत विक्रीसाठी येउ लागला. जिल्हयातील कापुस उत्पादक शेतक-यांना कापुस विक्रीसाठी सिसिआय व हेट्रेशन मार्फत असलेले केद्र सुरु करण्यासाठी प्रशासनास योग्य ती कारवाई करण्यास सुचवून जिल्हयातील सर्व ठिकाणी कापुस केंद्र सुरु केले.

परिसरात विविध झाडाचे रोपण करुन जिल्हा परिषद ईमारत व परिसराचा चेहरामोहरा बदलला. कामात गतीमानता यावी व वेळेत नागरीकांची कामे व्हावीत यासाठी प्रथमच जि.प.तील सर्व कक्षात इंटर कॉम सुविधा सुरु केली. कदाचित ही विदर्भातील पहिलीच जिल्हा परिषद असेल. यामुळे कर्मचारी,अधिकारी पुर्णवेळ कार्यालयात राहु लागले. कामात सुधारणा झाली. एव्हढेच नव्हे तर जिल्हा परिषदेच्या असलेल्या मालमत्ताचा शोध घेण्यासाठी एका समितीची स्थापना करुन अनेक बेवारस व अतिक्रमण झालेल्या जि.प.च्या जागा नावावर करुन घेतल्या.उघडयावर होणारी हागणदारी थांबवून गावे स्वच्छ व सुंदर करण्यासाठी गुड मॉर्निंग पथके बनविली. गावा-गावात सार्वजनिक शौचालये बांधली. जि.प.शाळाच्या सुधारणा करुन दर्जेदार शिक्षणासाठी विविध उपक्रम राबविले.गाव वाडयावस्त्यांच्या विकासासाठी ८ कोटीचा निधी मंजुर करुन घेतला ज्यामुळे दुर्गम व डोंगराळ भागात देखील पायाभुत सुविधा निर्माण केल्या.

शेतक-यासाठी जिल्हयात बिज प्रमाणीकरण कार्यालये स्थापन करण्यासाठी कषीमंत्र्याकडे वारंवार पाठपुरावा कायम आहे. यासाठी जलसंपदा मंत्र्याकडे पाठपुरावा करुन ३६.९२ कोटीचा निधी मंजुर केला ज्यामुळे जिल्हयात सिंचन क्षेत्रात वाढ झाली. परिणामी शेतक-यांच्या चेह-यावर हास्य उमलले.केंद्र सरकारने शेतकरी विरोधात घेतलेल्या कायदयाविरोधात बैल गाडी मोर्चा, निषेध मेळावे, आंदोलने केली. सता असो वा नसो त्यांच्याकडून मात्र जनहिताचे कार्य अविरत सुरुच असते. अशा या लाडक्या नेत्यावर जनता जिवापाड प्रेम करते. दादा म्हटल की,डोळयासमोर एकच नाव येते ते म्हणजे...चंद्रकांत ठाकरे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
सोमवार, दि. २५ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## ट्रकच्या धडकेत युवकाचा मृत्यू; मलकापूर शहर पोलिसांत मर्ग दाखल

**मलकापूर :** शहरालगतच्या जग्गु मामा ढाब्याजवळ भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात यवतमाळ जिल्ह्यातील ३० वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी मध्यरात्री घडली. या प्रकरणी मलकापूर शहर पोलीस स्टेशन येथे मर्ग दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ध्रुव साहेबराव लांजेवार (वय ३०, रा. दारबा नगर, वाडेगाव, जि. यवतमाळ) हे दुचाकीने जात असताना जग्गु मामा ढाब्याजवळ अज्ञात ट्रकने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या ध्रुव लांजेवार यांना नातेवाईकांनी तातडीने उपजिल्हा रुग्णालय मलकापूर येथे आणले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. उपजिल्हा रुग्णालयातील डॉ. शुभांगी फेंगडे यांच्या तर्फे कक्षसेवक संतोष कडू गवळी यांनी याबाबतची माहिती मलकापूर शहर पोलीस स्टेशन येथे दिली. त्यावरून मर्ग क्रमांक ३०/२०२६ कलम १९४ँ-एए प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. या घटनेचा प्राथमिक तपास पोउपनि शुभम बरदाडे करीत असून अपघातातील ट्रकचा शोध घेण्याचे काम पोलीसांकडून सुरू आहे.

# पंचायतराज अभियानात सुलज ग्रामपंचायत जिल्ह्यातून अव्वल !

### ◆ जळगाव जामोद येथील सुलज ग्रामपंचायतने पटकाविले सर्वाधिक गुण
### ◆ १ ५ लाख रुपयांच्या बक्षिसासाठी पात्र

प्रतिनिधी २५ मे

**जळगाव जामोद:** 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात' तालुक्यातील सुलज ग्रामपंचायतीने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. उत्कृष्ट नियोजन, लोकसहभाग, स्वच्छता व पारदर्शक प्रशासनाच्या बळावर सुलज ग्रामपंचायतीने सर्वाधिक गुण मिळवत अव्वल स्थान पटकावले असून, गावाला तब्बल १५ लाख रुपयांच्या पारितोषिकासाठी पात्रता मिळाली आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी गुलाबराव अधिकारी खरात, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. आर. मोहन, तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवशंकर भारसाकळे मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अभियान प्रभावीपणे पार पडले. जळगाव जामोद तालुक्यातील १२ ग्रामपंचायतींनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या या स्पर्धेत सुलज ग्रामपंचायतीने आदर्श कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविला. गटविकास अधिकारी संदीपकमार मोरे विस्तार अधिकारी राजेंद्र कोलते यांनी अभियानातील गावांना सातत्याने भेटी देऊन मार्गदर्शन केले. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या यशामध्ये सरपंच लता टापरे, अधिकारी जवंजाळकर, ग्रामपंचायत कविता उपसरपंच, सदस्य, अंगणवाडी सेविका, शिक्षक, आशा वर्कर्स, ग्रामपंचायत कर्मचारी, तसेच महिला बचत गट व ग्रामस्थांचे योगदान राहिले. ग्रामपंचायत कर्मचारी अरुण घोटे, राम इंगळे, पंचायत समिती कर्मचारी, सागर म्हसाळ, नरेगाचे गणेश देशमुख, सीआरपी व बचत गट समन्वयक विनोद शेगोकार यांनीही विशेष मेहनत घेतली.

> मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची जिल्हास्तरीय सुरुवात जळगाव जामोद तालुक्यातून झाली होती. हे अभियान सुलज ग्रामपंचायतीने यशस्वी करून दाखवले आहे. राज्यस्तरावरही ग्रामपंचायतीने उल्लेखनीय यश मिळवावे.
>
> **डॉ. संजय कुटे, आमदार.**

## पिंपळगाव राजा येथे शेतीच्या वादातून दोन गटांत हाणामारी; परस्परविरोधी गुन्हा दाखल

### ◆ शिविगाळ करीत डोक्यावर वार केल्याचा आरोप

प्रतिनिधी २५ मे

**खामगाव:** तालुक्यातील पिंपळगाव राजा येथे शेतीच्या कारणावरून नातेवाइकांमध्ये निर्माण झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी दोन्ही बाजूंनी दाखल केलेल्या परस्परविरोधी तक्रारींवरून पिंपळगाव राजा पोलिसांनी एकूण चार जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. याबाबत सलमा परवीन उनेद उल्ला खान (३०, रा. पिंपळगाव राजा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे आणि आरोपींचे शेतीच्या कारणावरून जुने वाद सुरू आहेत. दि. २३ मे रोजी सकाळी त्यांची ननंद आयेशाबी फिरण्यासाठी गेली असता आरोपी खुशतर एजाज खान ताहेर अली खान व त्यांचा मुलगा झुलकर नैन खुशतर एजाज खान यांनी तिला शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. त्यानंतर फिर्यादी सलमा परवीन या ईदच्या खरेदीसाठी बाजारात जात असताना आरोपींनी त्यांना रस्त्यात अडवून अश्लील शिवीगाळ केली. हा प्रकार त्यांनी घरी जाऊन पती उनेद उल्ला खान यांना सांगितला. त्यानंतर पती आरोपींना जाब विचारण्यासाठी इम्रान मसाला दुकानाजवळ गेले असता, दोन्ही आरोपींनी त्यांना मारहाण केल्याचा आरोप आहे. या मारहाणीत त्यांचा मोबाइल फुटला तसेच खिशातील २,००० रुपये हरवल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या तक्रारीवरून आरोपी खुशतर एजाज खान ताहेर अली खान व झुलकर नैन खुशतर एजाज खान यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच खुशतर एजाज खान ताहेर अली खान (वय ६०, रा. पिंपळगाव राजा) यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, २३ मे रोजी सकाळी ते इम्रान खान यांच्या दुकानावर किराणा सामान घेण्यासाठी गेले होते. त्याठिकाणी आरोपी उपस्थित होते. यावेळी शेताच्या धुऱ्यावरील दगडाच्या खुणेवरून वाद घालून आरोपी उनेद उल्ला खान एहसान उल्ला खान यांनी त्यांना ढकलून दिले, तर हुसेद खान उनेद उल्ला खान याने गूळ फोडण्याचा लोखंडी खिळा हातात घेऊन त्यांच्या डोक्यावर वार केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. या तक्रारीवरून आरोपी उनेद उल्ला खान एहसान उल्ला खान व हुसेद खान उनेद उल्ला खान यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## लोखंडी पाइप व बेल्टने युवकाला मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी २५ मे

**मलकापूर :** शहरातील नवीन ईदगाह गणवाडी रोड परिसरातील गुलशन प्लॉट येथे जुन्या वादाच्या कारणावरून १७ वर्षीय युवकाला लोखंडी पाइप, बेल्ट तसेच चापटा-बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी मलकापूर शहर पोलीस स्टेशन येथे तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी शेख मुसद्दीक अकल शेख राईस बागवान (वय १७, रा. ताज नगर पारपेठ, मलकापूर) याला आरोपींनी ङ्खतुझ्याशी बोलायचे आहेङ्ख असे सांगून सोबत नेले. त्यानंतर मागील मोटारसायकल धक्क्याच्या वादाच्या कारणावरून आरोपी शेख अकील शेख कलीम पटेल, शेख शकील शेख कलीम व सरफराज उर्फ जोकर शेख आरीफ (सर्व रा. पारपेठ, मलकापूर) यांनी त्याला मारहाण केली.

यामध्ये आरोपी शेख अकील याने फिर्यादीस लोखंडी पाइपने मारहाण केली, तर शेख शकील याने कमरेच्या बेल्टने मारहाण केली. तसेच सरफराज उर्फ जोकर याने चापटा व बुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. यावेळी 'पुन्हा आमच्या नादी लागलास तर जिवे मारून टाकू' अशी धमकीदेखील आरोपींकडून देण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणी मलकापूर शहर पोलीस स्टेशन येथे कायमी गुन्हा क्रमांक ३९८/२०२६ अन्वये कलम ११८(१), ११५(२), ३५१(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ग्रेड पोउपनि सुरेश रोकडे करीत आहेत.

## वारंवार पोर्टल ठप्प; अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांची उडाली झुंबड!

### ◆ अकरावी प्रवेश प्रक्रियेत तांत्रिक अडथळा !

प्रतिनिधी २५ मे

**खामगाव:** इयत्ता अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या नियमित फेरीच्या पहिल्या दिवसापासून विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. सकाळपासूनच प्रवेश पोर्टल संथगतीने सुरू होते. दुपारपर्यंत पोर्टल पूर्णपणे ठप्प झाल्याने लाखो विद्यार्थ्यांचे अर्ज अर्धवट राहिले, तर अनेकांना लॉगिनही करता आले नाही. त्यामुळे अर्ज भरण्यासाठी शिक्षण विभागाने २५ मे पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

यंदा अकरावी प्रवेशासाठी राज्यभरातून सुमारे १४ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. ८ ते २० मेदरम्यान शून्य फेरी पूर्ण झाल्यानंतर २२ मेपासून नियमित प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली.

> **अर्ज प्रक्रियेत वाढल्या विद्यार्थ्यांच्या अडचणी**
> पोर्टल बंद पडल्यामुळे विद्यार्थ्यांना अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यात मोठ्या अडचणी आल्या. अनेक वेळा लॉगिन करूनही माहिती सेव्ह होत नव्हती. काहींना ओटीपी मिळण्यास उशीर झाला, तर काही विद्यार्थ्यांचे पसंतीक्रम भरतानाच पोर्टल बंद पडले. ग्रामीण भागातील इंटरनेट समस्येमुळे विद्यार्थ्यांचा अधिक वेळ व पैसा खर्च झाला.

अर्जाचा भाग-१ भरणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आणि कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम निश्चित करणे ही प्रक्रिया सुरू होताच एकाच वेळी विद्यार्थी पोर्टलवर लॉगिन झाले. त्यामुळे सर्व्हरवर ताण निर्माण झाला आणि प्रणाली कोलमडली. सकाळपासूनच 'सर्व्हर बिझी', 'एरर', 'डेटा सेव्ह होत नाही', 'ओटीपी मिळत नाही' अशा तक्रारी विद्यार्थ्यांकडून करण्यात येत होत्या. काही विद्यार्थ्यांनी तीन ते चार वेळा अर्ज भरूनही माहिती सेव्ह झाली नसल्याची नाराजी व्यक्त केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंटरनेट सुविधेअभावी अधिक अडचणींना सामोरे जावे लागले.दुपारी साडेतीन वाजेपर्यंत पोर्टल बंद असल्याने प्रवेश प्रक्रियेबाबत संभ्रम निर्माण झाला होता. अखेर दुपारी ४ वाजल्यानंतर तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद आणि तक्रारी लक्षात घेता शिक्षण संचालनालयाने अर्ज भरण्याची मुदत २३ मे रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत वाढवली. शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांना अर्ज भरताना माहिती काळजीपूर्वक तपासूनच अंतिम सबमिट करण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, पहिल्या प्रवेश यादीत नाव आलेल्या विद्यार्थ्यांना २८ मेपर्यंत संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करावा लागणार आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात जलंब ग्रा.पं. द्वितीय !

### १ २ लाखांचे पारितोषिक; लोकसहभागातून विकास

प्रतिनिधी २५ मे

**खामगाव:** महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' २०२५-२६ अंतर्गत जलंब ग्रामपंचायतीने तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ग्रामपंचायतीला १२ लाख रुपयांचे पारितोषिक मिळाले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास विभागाच्या संकल्पनेतून साकारलेल्या या अभियानात जलंब ग्रामपंचायतीने विविध विकासकामांची प्रभावी अंमलबजावणी केली. स्वच्छता अभियान, शाळांची रंगरंगोटी, ग्रामपंचायत परिसराचे सुशोभीकरण तसेच विविध सामाजिक आणि विकासात्मक उपक्रमांवर विशेष भर देण्यात आला. या सर्व कामांमध्ये लोकसहभागाला प्राधान्य देण्यात आले.गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सरपंच वैशाली सुनील हेलोडे आणि ग्रामविकास अधिकारी व्ही. बी. राठोड यांनी विशेष पुढाकार घेतला. तसेच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी चंदनसिंग राजपूत आणि विस्तार अधिकारी राजपूत यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी वेळोवेळी गावाला भेट देऊन जनजागृती केली आणि विकासकामांचा दर्जा उंचावण्यासाठी सूचना दिल्या.

या यशात ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, ग्रामस्थ, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, महिला बचत गट, शिक्षक, मुख्याध्यापक तसेच स्थानिक पोलिस प्रशासनाचे सहकार्य लाभले.तालुक्यात द्वितीय क्रमांक आणि १२ लाखांचे पारितोषिक जाहीर झाल्यानंतर गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही रक्कम गावातील मूलभूत सुविधा आणि पुढील विकासकामांसाठी वापरण्यात येणार असल्याचे ग्रामपंचायत प्रशासनाने सांगितले.

## पिंप्री कोळी येथे वाळूच्या अवैध वाहतुकीवर कारवाई; चार टिप्पर जप्त

### नांदुरा पोलिसांकडून ५६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

प्रतिनिधी २५ मे

**नांदुरा:** पिंप्री कोळी शिवारात शुक्रवारी रात्री पोलिसांनी कारवाई करत वाळूची अवैध वाहतूक करणारे चार टिप्पर जप्त केले. या कारवाईत सुमारे ५६ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नांदुरा पोलिस ठाण्याचे दरम्यान, पोलिस अंमलदार विक्रमसिंग राजपूत व त्यांचे पथक ग्रामीण भागात गस्त घालत होते. पूर्णा नदीपात्रातून शासनाचा महसूल बुडवून पिंप्री कोळी मार्गे नांदुरा गावाकडे वाळूची अवैधरित्या वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.या माहितीच्या आधारे पोलिसांनी पिंप्री कोळी येथे पंचांसमक्ष नाकाबंदी केली. रात्री ८ वाजेदरम्यान समोरून येणारे चार टिप्पर थांबवून चालकांकडे वाळू वाहतुकीसंदर्भातील परवाना व कागदपत्रांची चौकशी करण्यात आली; मात्र चालकांकडे कोणतीही वैध कागदपत्रे आढळून आली नाहीत.

या कारवाईत प्रत्येकी सुमारे दोन ब्रासप्रमाणे एकूण आठ ब्रास वाळू जप्त करण्यात आली. तसेच प्रत्येकी अंदाजे १५ लाख रुपये किमतीचे चार टिप्पर असा एकूण ५६ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.या प्रकरणी रवींद्र प्रभाकर जाधव (रा.जवळा बाजार), मोहनगीर रामगिरी गोसावी (रा. वडनेर भोलजी), जितेंद्र मधुकर देवकर (रा. हरसोडा) व जितेंद्र रवींद्र झनके (रा. बहापुरा, मलकापूर) यांच्याविरुद्ध नांदुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिस अंमलदार विक्रमसिंग राजपूत यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच खाण व खनिज (नियमन व विकास) अधिनियम १९५७अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलिस हवालदार अमोल खोंदील करीत आहेत.

## श्रीगुरुदेव सेवाश्रम येथे सर्वांगिण सुसंस्कार शिबिराचा समारोप

प्रतिनिधी २५ मे

**नांदुरा:** श्रीगुरुदेव सेवाश्रम नांदुरा येथे आयोजित करण्यात आलेल्या' श्री गुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिरा'चा समारोपीय कार्यक्रम २० मे रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. २ मे २०२६ पासून सुरू असलेल्या या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार महर्षी आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून विठ्ठल कोठारी (अध्यक्ष, कोठारी शैक्षणिक संकुल), सचिन तायडे (सार्वजनिक बांधकाम विभाग), ॲड. भाऊराव भालेराव (खामगाव), सुरेश खंडेलवाल (संचालक, नांदुरा अर्बन), हभप नामदेव महाराज गव्हाळे (अमरावती) तसेच डॉ. नरेंद्र तराळे (अध्यक्ष राष्ट्रधर्म युवा मंच केंद्रीय समिती) बाळासाहेब पवार सामाजिक कार्यकर्ते नांदुरा) आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक हभप मनोज महाराज चौभे यांनी केले. समारोपीय कार्यक्रमात शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांना शिकविण्यात आलेल्या विविध कला, कौशल्ये व संस्कारांचे आकर्षक प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. योगासने, लेझीम, जुडो कराटे, लाठी-काठी, मल्लखांब, सामूहिक भजने, वक्तृत्व कौशल्य, गायन आदी विषयांवरील विद्यार्थ्यांचे सादरीकरण विशेष आकर्षण ठरले. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण, शिस्तबद्ध आणि प्रभावी सादरीकरणाने पालक मंत्रमुग्ध झाले.संस्कार महर्षी आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी यांनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांच्या जीवनात संस्कार, शिस्त, राष्ट्रभक्ती आणि चारित्र्यनिर्मितीचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी शिबिरातील शिक्षकवृंद तसेच शिबिरासाठी सहकार्य करणाऱ्या सहयोगदात्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास विविध भागांतून आलेले गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकर्ते, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रा. विनोद वेरुळकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनंत वडोदे यांनी व्यक्त केले.

## 'गो-हत्या रोखण्यासाठी उपाययोजना करा!'

### युवा हिंदू प्रतिष्ठानचे प्रशासनाला निवेदन

प्रतिनिधी २५ मे

**खामगाव:** शहर व ग्रामीण परिसरात वाढत्या गो-हत्या आणि गो-तस्करीच्या घटनांना आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्या, या मागणीसाठी युवा हिंदू प्रतिष्ठानच्या वतीने शुक्रवारी शहर पोलिस स्टेशन, शिवाजी नगर पोलिस स्टेशन तसेच खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात निवेदन देण्यात आले.

गुरांच्या निवेदनानुसार, चोरीच्या घटना घडणाऱ्या संवेदनशील भागांमध्ये मध्यरात्री २ ते पहाटे ६ या वेळेत विशेष पोलिस गस्त वाढविण्यात यावी, तसेच ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या आणि शहराबाहेर जाणाऱ्या मुख्य व अंतर्गत मार्गावर २४ तास नाकाबंदी व पोलिस बंदोबस्त ठेवण्यात यावा. गुरांची बेकायदेशीर वाहतूक करताना आढळणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई संबंधितांविरुद्ध अजामीनपात्र गुन्हे दाखल करण्याची मागणीही करण्यात आली आहे. करून याशिवाय, ज्या भागांत यापूर्वी गुरांचे अवशेष आढळून आले होते, त्या ठिकाणी विशेष पथके आणि गुप्तहेरांमार्फत सतत लक्ष ठेवण्यात यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदन देताना युवा हिंदू प्रतिष्ठानचे रोहित पगारीया, गोपाळ महल्ले, सौरभ पाटील, सुमित पिंपळकार, पवन पाटील, विशाल माडीवाले, सागर थानवी, सचिन हुरपाडे आदी पदाधिकारी, गोरक्षक उपस्थित होते.

## खामगावात जुगार अड्ड्यांवर धाड; १८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी २५ मे

**खामगाव:** जुगार अड्यांविरोधात पोलिसांनी कारवाई करत, दोन ठिकाणी धाड टाकली. शिवाजीनगर पोलिसांनी शहरातील पुरवार गल्ली परिसरातील घरगुती जुगार अड्डा उद्ध्वस्त केला, तर खामगाव ग्रामीण पोलिसांनी पळशी परिसरात धाड टाकत ११ जणांना रंगेहात पकडले. दोन्ही कारवाईत पोलिसांनी १८ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पहिली कारवाई शिवाजीनगर पोलिसांनी पुरवार गल्ली येथे केली. पोलिस अंमलदार देवेंद्र शेळके यांच्या फिर्यादीवरून स्वप्नील भिकूलाल गांधी, आकाश विलास किलोलीया, अमोल शंकरराव कुकडे, निलेश सुभाष कल्याणकर, कृष्णाकुमार नंदकिशोर राठी, मयुरेश मंगेश देशमुख आणि मंगेश राजू बाभुळकर यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. स्वप्नील गांधी यांच्या घरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर टाकलेल्या धाडीत एकूण १ लाख ४ हजार ४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दरम्यान, दुसरी कारवाई पळशी-बाळापूर मार्गालगत करण्यात आली. सहायक पोलिस निरीक्षक रवि मुंडे यांच्या फिर्यादीवरून संतोष धनोकार, रामेश्वर धनोकार, वासुदेव दांदळे, नंदकिशोर चव्हाण, गजानन चव्हाण, अरुण महाले, प्रभाकर ठोसरे, केशव चिंचोलकर, संतोष चव्हाण, सुनील चिंचोळकर आणि अनिल पल्हाडे या ११ जणांविरुद्ध कारवाई करण्यात आली.

## माऊली स्कूल ऑफ स्कॉलर्सची राष्ट्रीय पातळीवर सुवर्ण; कांस्य पदकांवर मोहर!

### १९ व्या सीनियर नॅशनल डॉजबॉल चॅम्पियनशिपमध्ये भक्ती खानझोड आणि आर्यन पुंडेची देदीप्यमान कामगिरी

प्रतिनिधी २५ मे

**शेगांव:** खेळाच्या मैदानात आपल्या कौशल्याची चुणूक दाखवत 'माऊली स्कूल ऑफ स्कॉलर्स'च्या विद्यार्थ्यांनी क्रीडा जगतात शाळेचा आणि महाराष्ट्राचा डंका वाजवला आहे. नुकतीच भोपाल (मध्य प्रदेश) येथे पार पडलेल्या १९ व्या सीनियर नॅशनल डॉजबॉल चॅम्पियनशिपमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवर घवघवीत यश संपादन करत सुवर्ण आणि कांस्य पदकांवर आपली मोहर उमटवली आहे.



> माझा प्रत्येक विद्यार्थी केवळ अभ्यासातच नव्हे, तर क्रीडा क्षेत्रातही उत्कृष्ट खेळाडू म्हणून देशाच्या पातळीवर चमकला पाहिजे, हेच आमचे स्वप्न आहे.
>
> **– श्री ज्ञानेश्वर दादा पाटील**
> (संस्थापक, माऊली स्कूल ऑफ स्कॉलर्स)

**महाराष्ट्राच्या संघाचा विजयी धडाका; मुलींचा संघ ठरला देशात 'नंबर वन'**

डॉजबॉल फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने दिनांक १८ ते २१ मे दरम्यान भोपाल येथे या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत देशभरातून अनेक नामांकित संघ सहभागी झाले होते. मात्र, महाराष्ट्राच्या संघाने सुरुवातीपासूनच मैदानात वर्चस्व राखले.

महाराष्ट्राच्या मुलींच्या संघाने आणि मिक्स टूर्नामेंट प्रकारात कमालीचे कौशल्य दाखवत मध्य प्रदेश, कर्नाटक, बिहार, तामिळनाडू आणि छत्तीसगड यांसारख्या बलाढ्य संघांना धूळ चारली. अटीतटीच्या झालेल्या या सामन्यांमध्ये महाराष्ट्राच्या संघाने प्रतिस्पर्ध्यांवर मात करत थेट प्रथम क्रमांक (सुवर्ण पदक) पटकावला.

**मुलांच्या संघाचीही कौतुकास्पद कामगिरी; पटकावले कांस्य पदक**

मुलींच्या संघाने सुवर्ण कामगिरी केली असतानाच, महाराष्ट्राच्या मुलांच्या संघानेही मागे न राहता आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन घडवले. राष्ट्रीय पातळीवरील तीव्र स्पर्धेत मुलांच्या संघाने तिसरे स्थान (कांस्य पदक) मिळवून राज्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला.

'माऊली स्कूल'चे चमकते तारे: भक्ती आणि आर्यन

या राष्ट्रीय विजेत्या संघामध्ये 'माऊली स्कूल ऑफ स्कॉलर्स'चे खेळाडू भक्ती ज्ञानेश्वर खानझोड आणि आर्यन नितेश पुंडे यांनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या या मैदानी कौशल्याचे आणि अष्टपैलू कामगिरीचे संपूर्ण क्रीडा जगतातून कौतुक होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. २५ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# 15 दिवसांवर पावसाळा शहरात नाले सफाईचा बोजवारा

प्रतिनिधी २५ मे

**अकोला :** यंदा पावसाळा पंधरा दिवसावर येऊन ठेपला आहे. मात्र, दरवर्षीप्रमाणे यंदाही अकोला शहरातील नालेसफाईच्या कामात महापालिका प्रशासनाची कमालीची उदासीनता समोर आली आहे. पावसाळ्यात ज्या भागात हमखास पाणी साचते, त्या संवेदनशील भागात अद्याप नालेसफाईच्या कामाला सुरुवातच झालेली नाही. पावसाळा अवघ्या पंधरा दिवसावर येऊन ठेपल्याने महापालिकेला यंदा नालेसफाईचा विसर पडलाय की काय?' असा संतप्त सवाल शहरातील नागरिक उपस्थित करत असून, यंदाही पावसाळ्यात संपूर्ण शहर जलमय होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

## ♦ महापालिका प्रशासनाची उदासीनता उघड





### मनपाला यंदा नालेसफाईचा विसर पडल्याची तक्रार

दरवर्षी पावसाळा सुरू होण्याआधी पूर्वतयारी म्हणून महापालिकेकडून नालेसफाई, व साफसफाईचा मोठा गाजावाजा केला जातो. कागदावर कोट्यवधी रुपयांच्या निविदा आणि नियोजनाचे आराखडे फिरवले जातात. मात्र यंदा प्रत्यक्ष जमिनी परिस्थिती अगदी उलट असल्याचे शहरात पाहायला मिळत आहे. नियमानुसार, पावसाळा सुरू होण्या आधी किमान पंधरा दिवस ते महिनाभर मनपाच्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी पाणी साचणाऱ्या सखल भागांची पाहनी करणे आवश्यक असते. शहरातील या गंभीर समस्येकडे मनपाच्या अधिकाऱ्यांनी पूर्णपणे पाठ फिरवली आहे. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना शहरातील नाल्यांची सफाई अतिक्रमण हटाव आणि पावसाच्या पाण्याचा निचरा यावरून पुन्हा एकदा प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे गतवर्षी नाले सफाईवर कोट्यावधी रुपयांचा खर्च करण्यात आला होता मात्र मुसळधार पावसासोबतच अवकाळी पावसातही शहरातील अनेक भाग जलमय झाले होते रस्ते चौक बाजारपेठा आणि निवासी वस्त्यांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला होता त्यामुळे यंदा पावसाळ्यात पुन्हा शहर तुंबण्याची शक्यता वर्तवली जात आहे

# कुणी गॅस सिलेंडर देता का? लॉक सिस्टीम मुळे दुरावले शेजारी

प्रतिनिधी २५ मे

## ♦ नवीन गॅस कनेक्शन मिळत नसल्याने नागरिक त्रस्त

**अकोला :** खाडी युद्धामुळे देशभरात इंधनाची समस्या निर्माण झाली आहे. यामुळे विशेषतः महिलांचे किचनचे संपूर्ण गणित बिघडले आहे. युद्धामुळे 'एलपीजी'च्या पुरवठा साखळीवर ताण येताच गॅस कंपन्यांनी नवीन कनेक्शन देणे बंदच करून टाकले. त्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून घरगुती गॅस सिलिंडर अभावी अनेक कुटुंबांची फरफट होत आहे. सिलिंडर देता का? म्हणून शेजाऱ्यांकडे, मित्रांकडे विनवणी करावी लागत आहे. अकोला शहरातील कोणत्याही गॅस कंपनीच्या एजन्सीवर ग्राहक गेला, तरी त्याला घरगुती वापराचे गॅस सिलिंडर मिळत नाही. नवीन कनेक्शन देणे सद्यस्थितीत बंद आहे. कंपनीच्या सूचना असल्याचे कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात येते. गेल्या दोन महिन्यांपासून हा मनाई आदेश लागू आहे. याशिवाय कमर्शियल सिलिंडरही आता सहज उपलब्ध होत नाही. या परिस्थितीत आधीपासून गॅस कनेक्शन नसलेले, स्थलांतरित मजूर, कामगार यांचे सिलिंडर अभावी हाल होत आहेत. त्यामुळे घरी स्वयंपाक करायचा तरी कसा? असा प्रश्न आता महिलांकडून उपस्थित केला जात आहे.



### कोणत्या सिलिंडरची काय स्थिती...

◆घरगुती गॅस सिलिंडरचा (१४.२ किलो) काळाबाजार व साठेबाजी रोखण्यासाठी केंद्र सरकारने सिलिंडर बुकिंगवर २५ दिवसांचा लॉक-इन कालावधी लागू केला आहे. ग्रामीण भागासाठी ही मुदत ४५ दिवसांची आहे. ग्राहकांना घरपोच सिलिंडर मिळाल्यानंतर ही मुदत सुरू होते. हा नियम अजूनही लागू आहे. लॉक सिस्टीम मुळे शेजारी दुरावले आहेत कोणाला कितीही गरज असली तरी आपले सिलेंडर कोणी कोणाला देण्यास तयार नसल्याचे सध्याचे चित्र आहे

### नवीन गॅस कनेक्शन उपलब्ध नाही. कृपया चौकशी करू नये

ग्राहक नवीन कनेक्शनसाठी नोंदणी करू शकतो, पण कंपनीकडून व्हेरिफिकेशन होत नाही. इराण युद्ध सुरू झाल्यापासून नवीन कनेक्शन देणे कंपनीने स्थगित केले आहे. कंपनीकडून पुढील सूचना प्राप्त होताच नवीन गॅस कनेक्शन दिले जाईल

**विजयसिंह ठाकूर,** व्यवस्थापक, गॅस एजन्सी.

### नवीन सिलेंडर लवकर मिळावे

गेल्या दोन महिन्यांपासून नवीन गॅस कनेक्शनसाठी एजन्सीमध्ये चकरा मारत आहोत. सिलिंडर मिळत नसल्याने घरात स्वयंपाकाची अडचण होत आहे. पाच किलोचे सिलिंडर तीन-चार जणांच्या कुटुंबाला परवडत नाही. सरकारने तातडीने समस्या सोडवावी.

**सागर गोळे** नवीन गॅस कनेक्शन घेण्यास इच्छुक ग्राहक

# शहरात 17 जूनला तिथीनुसार साजरी होईल महाराणा प्रताप जयंती

प्रतिनिधी २५ मे

**अकोला :** शहरात दरवर्षीप्रमाणे यंदाही तिथीनुसार हिंदू सूर्य महाराणा प्रताप यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाईल. यावर्षी सुद्धा शहरात भव्य शोभायात्रा काढली जाईल तसेच विविध कार्यक्रमाचे आयोजन महाराणा प्रताप बागेत केले जाईल असा निर्णय महाराणा प्रताप बागेत रविवारी संपन्न झालेल्या सभेत घेण्यात आला. महाराणा प्रताप सेवा समिती अकोला तसेच अखिल भारतीय क्षत्रिय महासभा शाखा अकोला तर्फे या



सभेचे आयोजन करण्यात आले होते तिथीनुसार साजरी होणाऱ्या महाराणा प्रताप जयंती निमित्त या सभेत चर्चा करण्यात आली. महाराणा प्रताप जयंती निमित्त शहरात काढण्यात येणाऱ्या शोभायात्रा आणि विविध कार्यक्रमात समाज बांधवांनी आणि तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सामील व्हावे असे आवाहन यावेळी करण्यात आले या सभेला मोठ्या संख्येने क्षत्रिय समाज बांधव उपस्थित होते.

# महिले सोबत गैरवर्तन करणारा पोलिस अंमलदार निलंबित

प्रतिनिधी २५ मे

अकोला : येथील मोटार परिवहन विभागात कार्यरत पोलिस शिपाई सचिन केशव गायकवाड याच्याविरुद्ध एका महिलेची लग्नाचे खोटे आमिष दाखवून वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित करणे, मानसिक छळ करणे व जीवे मारण्याची धमकी देणे बाबत तक्रार सिटी कोतवाली पोलीस स्टेशन ला दाखल झाली होती. या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस स्टेशन सिटी कोतवाली गुन्हा नोंदवून आरोपीला अटक केली.

पोलिस निरीक्षक संजय गवई यांनी माहिती वरिष्ठांना सांगितली. पोलिस अधीक्षक यांनी तात्काळ कारवाई करत संबंधित कर्मचाऱ्याला २३ मे पासून शासकीय सेवेतून निलंबित केले आहे. कायद्याचे ज्ञान असूनही अशा प्रकारचे गैरवर्तन केल्याने पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी गंभीर दखल घेत कठोर कायदेशीर कारवाई केली. महिला विषयी गैरवर्तन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# अकोल्यात पेट्रोल ७.३५ पैशांनी तर डिझेल ७.५३ पैशांनी महागले

प्रतिनिधी २५ मे

**अकोला :** खाडी युद्धाचे परिणाम आता संपूर्ण भारतात दिसून येत आहेत. इंधनाची आवक घटल्यामुळे इंधनाच्या दरांचा आलेख वर चढत आहे. गेल्या १० दिवसांत चौथ्यांदा पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढल्या असून, यामुळे अकोल्यात पेट्रोल १११.४६ रुपये तर डिझेल ९८.२१ रुपये प्रति लीटर झाले आहे. अकोला शहरात आतापर्यंत पेट्रोल ७.३५ पैशांनी तर डिझेल ७.५३ पैशांनी महागले आहे. सरकारने इंधन टंचाईच्या काळात १५ मे रोजी पेट्रोल आणि डिझेलचे दर वाढवले होते, तेव्हा अकोल्यात पेट्रोलचा दर १०४.११ रुपये होता, जो आता वाढून १११.४६ रुपये झाला आहे.

प्रीमियम पेट्रोलच्या दरातही लिटरमागे मोठी वाढ झाली आहे. डिझेलचा दर ९०.६८ रुपये होता, जो सोमवारी चौथ्यांदा दर वाढवल्यानंतर ९८.२१ रुपये झाला आहे. अशा प्रकारे पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढल्यामुळे वाहनधारकांचे बजेट कोलमडले आहे, तर दुसरीकडे महागाईने उच्चांक गाठला आहे. शेतीची मशागत आणि पेरणीच्या कामांच्या तयारीमुळे शेतकरी डिझेलची व्यवस्था करण्यात गुंतले आहेत. अकोला जिल्ह्यात सध्या कोणतीही टंचाई नाही, पुरेसा साठा असल्यामुळे पेट्रोल पंपांवर परिस्थिती सामान्य दिसत आहे.




# अनभोरा जवळ भीषण अपघातात युवक ठार

प्रतिनिधी २५ मे

**मूर्तिजापूर :** राष्ट्रीय महामार्गावर अनभोरा गावाजवळ रविवारी पहाटे घडलेल्या भीषण अपघातात एका २७ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य तिघेजण जखमी झाले. भरधाव ट्रक-टेलर चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात घडल्याची माहिती समोर आली असून, अपघातानंतर चालक वाहनासह फरार झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पवन दिपक वानखडे (वय २७, रा. सिद्धार्थ नगर,



बोरगावमंजू) हा आपल्या सहकाऱ्यांसह सरगम बॅण्ड पार्टीच्या वाहनाने कारंजा येथून मूर्तिजापूरमार्गे बोरगावमंजूकडे परतत होता. दरम्यान, अनभोरा गावाजवळ वाहनाचा टायर पंचर झाल्याने सर्वजण रस्त्याच्या कडेला थांबले. पवन वानखडे व त्याचे सहकारी स्टेपनी टायर बसवून नट घट्ट करत असतानाच मूर्तिजापूरकडून भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात ट्रक-टेलरने त्यांना जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत पवन वानखडे यांचा जागीच मृत्यू झाला. तर रोहित गोटमारे, तौफीक शाह आणि सतीश वानखडे हे तिघेजण गंभीर जखमी झाले. अपघातानंतर ट्रक-टेलर चालक घटनास्थळावरून पसार झाला. जखमींना तत्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या प्रकरणी प्रविण दिपक वानखडे (वय ३२) यांच्या फिर्यादीवरून मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच सहकलम १८४ मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास थानेदार श्रीधर गुट्टे यांच्या मार्गदर्शनात दिनेश सोळंके करीत आहेत.







# अकोला जिल्ह्यात उष्णतेचा कहर कायम ; आजपासून नवतपाला सुरुवात

प्रतिनिधी २५ मे

**अकोला :** जिल्हावासीयांना पुढील काही दिवस भीषण उष्णतेपासून दिलासा मिळण्याची चिन्हे दिसत नाहीत. सकाळी ९ वाजल्यापासूनच सूर्य आग ओकू लागतो. याच दरम्यान उद्या सोमवारपासून 'नवतपा' सुरू होणार आहे. या काळात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र नागपूरने पुढील ५ दिवसांसाठी २३ मे रोजी हवामानाचा अंदाज दिला आहे, त्यानुसार जिल्ह्यात पुढील पाच दिवसांपर्यंत हवामान सतत कोरडे राहील. तसेच काही ठिकाणी उष्णतेची लाट राहण्याचा इशारा देत 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. शनिवार, २३ मे रोजी जिल्ह्याचे कमाल तापमान ४४.९ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. विशेष म्हणजे, जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून उष्णतेने रौद्र रूप धारण केले आहे. सकाळी १० वाजल्यापासूनच रस्त्यांवरील वर्दळ खूप कमी झालेली पाहायला मिळते. तर दुपारनंतर १२ वाजल्यापासून बाजारपेठा आणि चौकांमध्ये शुकशुकाट नजरेस पडतो. कडक ऊन आणि उष्ण वाऱ्यांमुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी, मजूर आणि वाटसरूंना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे. नौतपा दरम्यान सूर्याची किरणे अतिशय प्रखर होऊन पृथ्वीवर येतात. ज्यामुळे तापमानात आणखी वाढ होऊन उष्ण वारे वाहण्याची स्थिती निर्माण होते. अकोला जिल्ह्यातच यावेळेस कमाल तापमान ४६.९ अंशांपर्यंत नोंदवले गेले आहे, जे गेल्या काही वर्षांत कधीही इतके वाढले नव्हते. हवामानाची सध्याची स्थिती पाहता हे स्पष्ट दिसत आहे की, किमान पुढील एक आठवडा तरी सर्वसामान्य नागरिकांना या भीषण उष्णतेपासून दिलासा मिळणारा नाही. नौतपा सुरू झाल्यानंतर सूर्याच्या उष्णतेसोबतच उकाडा देखील कहर करू शकतो. दुसरीकडे, जर मान्सूनपूर्व पाऊस झाला, तर मात्र दिलासा मिळण्याची आशा आहे.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK